# आधुनिक मराठी कविता : भावार्थ

संपादक

**डॉ. संगीता ग. घुगे**

(मराठी विभाग)

शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर जि. नांदेड.

सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड.

**ISBN NO. 978-81-996546-1-7**

**आधुनिक मराठी कविता: भावार्थ**

❖ **संपादक**

**डॉ. संगीता ग. घुगे**

**(मराठी विभाग)**

**शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर जि. नांदेड.**

मो. नंबर: ९८८१२१९५५९

❖ **प्रकाशक**

सिद्धी **पब्लिकेशन हाऊस,**

बेलानगर भावसार चौक, तरोड़ा खु. नांदेड.

मो. नंबर ९६२३९७९०६७

www.wiidrj.com

❖ **मुद्रक**

अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.

**प्रथमावृत्ती : डिसेंबर २०२५**

© **सर्वाधिकार संपादकाच्या अधीन**

**मुखपृष्ठ :** तेजस रामपुरकर

**अक्षरजुळवणी :** सौ. पल्लवी शेटे

**मूल्य** : **२००**

(टीप: सदरील ग्रंथातील कोणताही भाग किंवा मजकुराकरीता सदरील संशोधक स्वत: जबाबदार राहतील. संपादक किंवा प्रकाशक जबाबदारअसणार नाही.)

# अर्पण पत्रिका

अग आई, तू लिहीत राहा! तुझ्यात एक वेगळी लेखणीची शक्ती आहे असे ठामपणे सांगणारी माझी मुलगी

चि. कु. संस्कृती राजेश बुधवंत हिला अर्पण!

# प्रास्ताविक :

**आधुनिक मराठी कवितेचे स्वरूप व व्याख्या:-**

आधुनिक मराठी कवितेचा अभ्यास करताना, तिच्या विविध प्रवाहांचा अभ्यास आपणास करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व कालखंड व स्वातंत्र्यरोतर कालखंड यासाठी महत्त्वाचे ठरतात. या दोन्ही कालखंडात ही कविता विविध प्रवाह निर्माण करत पुढे जाताना दिसते. खऱ्या अर्थाने या कालखंडातील आधुनिक मराठी कविता ही विविध वळणे घेत-घेत आजपर्यंत वेगवेगळया प्रवाहातून सक्षमपणे पुढे जात आहे; याचा अभ्यास आपणाला खालीलप्रमाणे करावा लागतो. यामध्ये आपण प्रथमतः कवितेच्या व्याख्या पाहू.

**पारंपरिक व्याख्या:**

१. शब्दार्थो संहितो काव्यम् - संस्कृत मीमांसक भामह (संस्कृत व्याख्या)
२. काव्यस्य आत्मा ध्वनी - ध्वनी सिद्धांत पुरस्कर्ते आनंदवर्धन (संस्कृत व्याख्या)
३. काव्य रसात्मक वाक्यंम् - भोजराज (संस्कृत व्याख्या)
४. कविता म्हणजे प्रतिमेची सेंद्रिय संघटना - सुप्रसिद्ध समीक्षक सुधीर रसाळ
५. नादवती, अर्थवती व ध्वनीवती शब्दरचना म्हणजे कविता - प्रसिद्ध कवी व समीक्षक वसंत आबाजी डहाके
६. रसात्मक वाणी म्हणजे कविता होय. (भारतीय व्याख्या)

**पाश्चात्य व्याख्या :**

1. The spontaneous overflow of powerfull feelings - सौंदर्यवादी कवी व समीक्षक वड्र्स वर्थ (उस्फुर्त भावनाचा सहज उद्रेक म्हणजे कविता होय.)

2. Poetry is a spontaneous imitation of nature - अरिस्टॉटल (कविता म्हणजे निसर्गाचे सर्जनशील अनुकरण आहे.)
3. Poetry is the record of the best and happiest moment of the happiest and best mind - शेली (कविता म्हणजे श्रेष्ठ आणि आनंदी मनाच्या श्रेष्ठ क्षणाचे, लिपीबद्ध स्वरूप होय.)
4. Poetry is the criticism of the life - Myathu Aanrold (कविता म्हणजे जीवनाचे चिंतन व परीक्षण होय.)

वरील सर्व मान्यवरांच्या व्याख्या पाहिल्यानंतर कविता म्हणजे काय? तर भावनांचे सौंदर्यपूर्ण, कलात्मक व प्रभावी भाषेतले व्यक्तिकरण होय. ज्यामुळे काव्यात विविध रस निर्माण होऊन, वाचकाच्या मनावर परिणाम करतात. कविता या साहित्य प्रकाराचे वैशिष्ट्य हे एका ओळीतून स्पष्ट करणे तसे अवघड काम आहे; तरी वरील सर्व मान्यवरांच्या, अभ्यासकांच्या व्याख्येतून कवितेचा आकृतीबंध अभ्यासता येतो.

कवी हा कवितेमधून आपल्या अवतीभोवतीचा, स्वतःचा व जीवन जाणिवांचा शोध घेत राहतो व त्याला आलेले रोजचे जीवनामधील अनुभव जे असतात; त्याला नवे आयाम कवितेच्या माध्यमातून देण्याचा तो प्रयत्न करतो. एक व्यक्ती म्हणून तो आपल्या अवतीभोवतीच्या अनेक सामाजिक, भौतिक, राजकीय, सांस्कृतिक व मानसिक पर्यावरणाचा जणू घटक बनतो. त्यामुळेच की काय त्याच्या अंत:करणावर जे अनुभव बिंबवल्या गेलेले असतात, ते काहीसे गूढ तितकेच खोल, गंभीरही असू शकतात. अर्थात इथे तो

आपल्या भावनांच्या माध्यमातून, मनाच्या पातळीवर, उत्कट शब्दात, आपल्या भावनाच विशद करतो. हा त्याचा ‘स्व’विषयक भाव  महत्त्वाचा असल्याने, आधुनिक मराठी कवितेचे ते महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते.

आपल्या समाज जीवनातील व्यापक अनुभवही तितकेच महत्त्वाचे मानले जातात व हे आकलन कवी आपापल्या परीने शब्दांच्या माध्यमातून मांडत असतो; यातून त्याची कविता समृद्ध होत जाते. इथे विविध कवींचे, विविध अनुभव, त्यांचे जगणं व वास्तव जीवन यातून काव्य प्रगट होते. कवीच्या कवितेतून जे अनुभव विश्व पाहायला मिळते, ते एका वेगळया जगाचे प्रतिबिंब जरी असले, तरी त्याचे अनुभव मात्र व्यक्तिगतच असतात. शिवाय ते त्याच्या कवितेतील शब्दाचा भाग म्हणून येत असतात. हा कवितेतील काव्यानुभव महत्त्वाचा असल्याने, तो कवितेचा विशेष असतो व त्याच स्वरूपातून ती कविता पुढे-पुढे जाते राहते आणि यातून कवीचे व्यक्तिमत्व प्रगट होते.

**कवितेचे घटक:**

कवितेची प्रकृती व संरचना मांडतानाही कवीला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते म्हणून तर कविता हा साहित्यप्रकार तरल अनुभूतीला जोपासणारा असा आहे. कवितेत शब्द, अर्थ व शैली यांना महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळेच तर ती कविता अभ्यासकांना, वाचकांना जीवनविषयक नवा दृष्टीकोन समजावून सांगते. ही कवितेची शब्दकळा, प्रतीके, नवनव्या प्रतिमा व रूपक यातून दिसून येते. कवितेचा हा सौंदर्यभाव वाचकांना आनंद देतो. त्यामुळे ही कविता अभ्यासताना तिच्यातील विविध सौंदर्य हे त्या त्या घटकांनुसार महत्त्वाचे ठरतात.

एखाद्या कवितेला कविता म्हणत असताना तिच्या काही घटकांचा अभ्यास करावा लागतो. कवितेत असणारी लयबद्धता, गेयता, अनेकार्थक्षमता, अल्पाक्षरत्व, व्यापक जीवनानुभूती, जीवनक्षमता, कालातीत वर्तमान, सेंद्रिय एकात्मता व संवेदनशीलता इत्यादी अनेक कवितेचे महत्त्वाचे घटक सांगता येतात. यातील लयबद्धता किंवा कवितेतील नाद हा महत्त्वाचा घटक मानला जातो. पूर्वीच्या काळातील लोकसाहित्यातील लोकगीत, मध्ययुगीन मराठीतील पद्य किंवा आधुनिक कालखंडातील कविता यातील नाद प्रथमतः समजून घेणे कवितेसाठी महत्त्वाचे आहे. कविता ही छंदबद्ध असेल किंवा मुक्तछंदातील असेल पण तिच्यात एक अंतर्गत लय असतेच जी की कवितेची नैसर्गिक प्रकृती मानली जाते व यासाठी कवितेतील नाद हा आशयसापेक्ष जरी असला तरी तो आशयाला महत्त्वाचे रूप देतो. या नाद निर्मितीमध्ये शब्द व भाषेची भूमिका खूप महत्त्वाची ठरते.

अनेकार्थता हा काव्याचा महत्त्वाचा घटक असून, तो काव्यानुभवाला दिशा देण्याचे काम करतो व यातून निघणारा अर्थ हा वाचार्थ नसून तो व्यंग्यार्थ सुचित करतो. अर्थात इथे शब्दशक्तीने अर्थ हा वाचकाला घ्यावा लागतो. कवी आपल्या मनातील तरल अनुभूतीला, भावविश्वाला, अर्थाच्या विविध पैलूंनी प्रगट करतो. तेव्हा कवितेला एक विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. मग त्यातून अर्थाचे विविध स्तर उलगडत जातात. त्यामुळे कविता ही भावव्यंजक ठरते. त्यातील प्रतिमा, प्रतीक हे कवितेत महत्त्वाची जागा घेतात व कवितेला कमीत कमी शब्दात अर्थ प्राप्त करून देतात; हाच तर कविचा मूळ स्वभाव असतो व त्यामुळे त्या कवितेला अल्पाक्षरत्व प्राप्त होते; जे की कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते.

कवितेमध्ये अनुभवाचे विश्व प्रगट होत असल्याने; तिचे रूप कवी संक्षिप्तपणे अभिव्यक्त करतो. हा भाषिक प्रयोग नवनव्या शब्दांचा शोध घेऊन अर्थाच्या पातळीवर जातो व ती कविता आशयाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. व्यापक जीवनानुभव क्षमता हा कवितेचा महत्त्वाचा घटक असल्याने; यामध्ये कमीत कमी शब्दात जीवनजाणीवा अनुभवाच्या पातळीवर कवी व्यक्त करतो. हे कवीचे जीवनविषयक आकलन जितके खोल, व्यापक असेल तोच आशय त्या कवितेत उत्कट व उत्स्फूर्त येत असतो. त्यामुळे हे चिंतन किंवा जीवन जाणिवा या स्थलकाल निरपेक्ष वाटायला लागतात. रोजच्या संदर्भातील अनुभव हे वर्तमान संदर्भाच्या पुढे जाऊन कालातीत अनुभव नव्या क्षमतेने घट्टरूप घेत असतात. त्यामुळे कोणतीही कविता वर्तमानाशी संवाद साधत असेल तर ती श्रेष्ठच असते. कवितेचा हा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून तिची सेंद्रिय एकात्मता हा विशेष मानावा लागतो. इथे सेंद्रियत्व म्हणजे चैतन्य किंवा सजीवता होय.

कवितेतील शब्द, प्रतिमा, प्रतीके व रूपक यामुळे भाषिक घटकांचा अभ्यास हा कवितेतून करता येतो. कवीच्या जीवन अनुभूतीतून तो काव्यरूपाने प्रगट होत असतो. या सर्व घटकांच्या एकात्मतेमुळे कवितेला सजीवपणा निर्माण होऊन, तिच्यातील शब्द, लय व अर्थ या तत्त्वामुळे एकात्मता येते म्हणजे जिवंतपणा प्राप्त होतो. कवितेतील विविध घटकांमुळे जी एकात्मता निर्माण होते, त्यामुळे कवितेचे अनन्यसाधारण काव्यार्थ पाहायला मिळतात. संवेद्यता हा कवितेचा महत्त्वाचा घटक असल्याने त्याचे रूप मूलगामी व तीव्र असते; म्हणून तर कविता ही संवेदनशील जीवनानुभवाच्या जाणीवा व्यक्त करते. कवितेमधील रंग, रूप, गंध

व स्पर्श या संवेदना अत्यंत तीव्रपणे कवी व्यक्त करत असल्याने, कवितेची भाषा ही रूढ व्याकरणाचे नियम बाजूला ठेवताना दिसते, म्हणजेच व्याकरणाचे नियमोल्लंघन ती करते परंतु कवितेतील शब्द, वाक्य, चिन्ह, रूपक, प्रतिमा व प्रतीके यांना अनन्यसाधारण महत्त्व असते; हेच महत्वाचे घटक घेऊन कवी आपला काव्यानुभव विशद करतो व विविध काव्य प्रकारातून कविता ही जीवनाचा नव्याने स्वतःचा शोध घेत राहते.

**आधुनिक मराठी कवितेचे स्वरूप:**

'आधुनिक मराठी कविता' या अनुषंगाने विचार करताना या कवितेचे प्रथमतः स्वरूप समजून घेणे महत्त्वाचे ठरते. खरे तर आधुनिक मराठी कविता अभ्यासताना ती विविध प्रवाहातील महत्त्वाची कविता दिसून येते. ही संकल्पना मराठीमध्ये इंग्रजी सत्तेच्या आगमनानंतर निर्माण झालेली दिसते. साधारणत: सन १९१८ मध्ये इंग्रजी सत्तेचा अंमल निर्माण झालेला दिसतो. त्यामुळे आपल्या भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये कमालीचा बदल झालेला दिसून येतो. इथे पाश्चात्त्य विचार व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाल्याने मराठी भाषिक माणूस त्यापासून बाजूला कसा असेल? तेव्हा त्याचा परिणाम मराठी माणसावर होऊन, मध्ययुगीन अध्यात्मिक विचार या काळात मागे पडला व विज्ञानवादी विचार पुढे आला. यातून नवे मूल्य, नवीन शिक्षणप्रणाली समाजामध्ये निर्माण झाली. त्याचाच प्रभाव मराठी कवितेवरही पडला आणि त्या माध्यमातून आधुनिक मराठी कविता निर्माण झाली!

मध्ययुगीन कालखंडातील आत्मिक, अध्यात्मिक काव्य जाणिवा बाजूला गेल्यामुळे, कवितेतील पारंपरिक रचनाबंध मागे पडले व पाश्चात्य काव्यरूपाचे अनुकरण मराठी कविता करू लागली.

यासोबतच व्यक्तीच्या भावना, विचार हे कल्पनेच्या पातळीवर अभिव्यक्त होऊ लागले.तसेच कवीचा ‘स्व’ अनुभव, ‘स्व’ जाणिवा या कवितेतून अभिव्यक्त होऊ लागल्या.यामुळे आधुनिक मराठी कवितेत कमालीचा बदल दिसू लागला, यातून अनेक कवींच्या कविता पुढे येऊ लागल्या.

आधुनिक मराठी कवितेचे स्वरूप समजून घेताना खालील काही पैलूंचा अभ्यासही आपणाला करावा लागतो; कारण ही कविता परंपरेपासून वेगळी, नवे भावविश्व निर्माण करणारी, नवे आशय व  नवी अभिव्यक्ती निर्माण करणारी आहे असे वाटायला लागते.

**परंपरेपासून वेगळेपण :** पारंपरिक छंदोबद्ध, अलंकार प्रधानता, भाव काव्यात्मक शैलीपासून ही कविता मुक्त आहे. ती व्यक्तिनिष्ठ, अंतर्मुख व प्रयोगशील पद्धतीची आहे.

**वैयक्तिकता व आत्मकेंद्रीपण :** या कवितेत कवींचे स्वतःचे अनुभव, वैयक्तिक विचार, भावभावना, अस्तित्वाच्या समस्या दिसून येतात. यासोबतच व्यक्तीच्या जीवनातील एकाकीपण, विविध ताणतणाव, अस्तित्वाचे प्रश्न व विविध सामाजिक समस्या या कवितेत आलेल्या दिसतात.

**सामाजिक व राजकीय भान :** स्वातंत्र्योत्तर काळातील बदल, युद्ध, औद्योगीकरण, शहरीकरण, बाजारीकरण, खाजगीकरण, वर्ग संघर्ष, दलित, ग्रामीण व स्त्री प्रश्न या कवितेत पाहायला मिळतात. त्यामुळे ही कविता वास्तववादी दृष्टिकोन घेऊन पुढे येते व अन्याय, विषमता व शोषण या विरुद्ध आवाज उठवताना दिसते.

**भाषेतील बदल :** पूर्वीच्या कवितेतील अलंकार प्रचूर भाषा इथे दिसत नाही म्हणून या कवितेमध्ये कवींची भाषा साधी, सोपी व

दैनंदिन बोलचालीची आहे. लय-तालापेक्षा भावनिक गुंतागुंत तिच्यात जास्त आहे व यातून प्रतिमा निर्मितीवर कवीने भर दिलेला दिसून येतो.

**मुक्तछंदाचा वापर :** आधुनिक मराठी कवितेत पारंपरिक वृत्त, ओव्या व अभंग फारसे पाहावयास मिळत नाही म्हणून ही कविता मुक्तछंदात असून, काहीसी गद्यप्राय वाटते. छंद–मात्रा यांच्या बंधनात ती अडकत नाही. त्यामुळे ही कविता आशयगहन अशी आहे.

**नवनवीन प्रवाह :** आधुनिक मराठी कवितेत अनेक प्रवाह निर्माण झालेले दिसतात. उदा. प्रयोगशील कविता, मुक्त छंद, अमूर्त प्रतिमा व बौद्धिकता घेऊन ती येते. पुढे याच कवितेचे नवकाव्यात रूपांतर होताना दिसते व या नवकाव्यात व्यक्तिवेध, अस्तित्ववाद व एकाकीपणाचा शोध ती घेते.

दलित कवितेमध्ये जातीय विषमता, सामाजिक शोषणाविरुद्धचा लढा ती देते तर ग्रामीण कवितेमधून शेतकऱ्यांचे दुःख, त्याचे जगणे वास्तवात मांडते. स्त्रीवादी कवितेमध्ये स्त्रियांचे अनुभवविश्व वास्तवाच्या पातळीवर रेखाटत जाते व स्त्रीचा आत्मसंघर्ष विशद करते. लोकवादी किंवा जनवादी कवितेमधून सामान्य माणसाच्या आयुष्याशी थेट संवाद साधला जातो व त्यामुळे भाषा समृद्ध होतांना दिसते.

**प्रतिमा व प्रतीकांचा वापर :** आधुनिक कवींनी आपले अनुभव, जटील व गुंतागुंतीचे भावविश्व सांगण्यासाठी जोडल्याने विविध प्रतिमा, प्रतीक आणि रूपक वापरलेली दिसतात. कधी-कधी ती अमूर्त व बौद्धिक पातळीवरची अभिव्यक्तीच वाटायला लागतात.

**आयुष्याचा संपूर्ण वेध :** आधुनिक मराठी कवितेमध्ये सौंदर्य, निसर्ग व प्रेम यावर फारसे भाष्य न करता जगण्याचा, संपूर्ण जीवनपट पाहायला मिळतो. त्यामुळे तिच्यात दुःख, ताण, परकेपणा, निराशा, संघर्ष, बंडखोरपणा, आशा व विविध स्वप्ने या बाबींवर भर दिलेला दिसतो.

थोडक्यात वरील सर्व वैशिष्ट्याने आधुनिक मराठी कविता तयार झालेली असून, तिच्यात प्रयोगशीलता, वास्तववादी दृष्टिकोन, वैयक्तिक व सामाजिक भान, मुक्तछंदातील मांडणी, साधी, सोपी प्रवाही भाषा व मानवी अस्तित्वाचा शोध पहावयास मिळतो.

**नवकविता:**

साधारणतः दुसऱ्या महायुद्धाच्या आसपासचा कालखंड हा नवकवीतेचा मानला जातो. नवकवीतेचे स्वरूप हे जुनी भावकविता, छंदबद्ध परंपरा व अलंकारप्रधानता यापेक्षा पूर्णपणे वेगळे दिसून येते. या कवितेत अस्तित्ववादी भान कवीला आलेले दिसते. व्यक्तीचं अस्तित्व, एकाकीपण, परकेपण व बकालपण हे अविभाज्य अंग या कवितेचे सांगता येते. जीवनातील अर्थहीनता, रिकामेपणा व असुरक्षितता याही बाबी या कवितेत पाहायला मिळतात. ही कविता व्यक्तिनिष्ठ असल्याने, तिच्यात सामूहिकतेपेक्षा व्यक्तिगत अनुभव, आत्म- संघर्ष, मनातील गोंधळ आणि अनामिक भीती दिसून येते व 'मी' हाच केंद्रबिंदू या कवितेचा वाटायला लागतो. या कवितेत वास्तवाचे भान असल्याने, शहरातील जीवन, औद्योगीकरण, तुटलेली नाती, बदलती मूल्य व मानवी ऱ्हास यामुळे ग्रामीण, शहरी ताणतणाव, जगण्यातील विसंगती ती चित्रीत करते.

भाषा साधी, सोपी, प्रवाही पण परंपरागत गोडव्याऐवजी कटू, कोरडी, कडवट पाहायला मिळते. मुक्तछंद, गद्य कविता, तुटक वाक्यरचना यांचा वापर येथे केल्याने, तिच्यातील तालापेक्षा ही कविता भावनिक संघर्षाला जवळ करते. यासोबतच मनातील अस्वस्थता, विसंवाद, भीती, नैराश्य व गोंधळ यांची अभिव्यक्ती प्रगट करून मानसिकतेचा शोध घेत राहते.

आधुनिक मानसशास्त्राचा प्रभाव या कवितेवर जास्त पडलेला दिसतो. यातून येणारी प्रतीक व प्रतिमा यामुळे ही कविता गुंतागुंतीची व मूर्त अशी वाटते. तिच्यात दैनंदिन जीवनातील गोष्टी या अनेक प्रतीकरूपाने येताना दिसतात. उदा. पोकळी, भिंत, सावली व वाळवंट वगैरे.

नवकवितेत कवी सामाजिक प्रश्नापासून अलिप्त राहिलेला दिसतो पण समाजातील अंतर कटाक्षाने दाखवतो. त्यामुळे ही कविता जास्तीत-जास्त मनाच्या एकाकी अवस्थेचे चित्र व्यक्त करते. यामध्ये कवी कुसुमाग्रज हे अस्तित्ववादी वेदना मांडताना दिसतात तर वि. स. खांडेकर हे नवचेतनेशी निगडित काव्य लेखन करतात. बा. भ.बोरकर व शांताबाई शेळके हे भावविश्वातील बदल सुचित करतात. यासोबतच अरुण कोलटकर, विंदा करंदीकर, दिलीप चित्रे, मधुकर कुलकर्णी, इंदिरा संत व अरुण साठे यांच्या कविता नवकवितेच्या प्रतिनिधी करणाऱ्या ठरतात. यातील बा.सी. मर्ढेकर यांना नवकवितेचे जनकत्व दिले जाते.

थोडक्यात नवकविता ही स्वतःच्या अस्तित्वाशी झगडणाऱ्या, आधुनिक व्यक्तीचे एकाकीपण, अंतर्मुखता, तुटक व कटू अनुभव मांडणारी अशी वाटायला लागते.

**मुस्लिम कविता :**

मुस्लिम साहित्याची परंपरा तशी फार जुनी आहे. अर्थात ती संत काळापासून ते आजपर्यंत अनेक कवींनी जोपासलेली दिसून येते. अगदी मध्ययुगीन काळात म्हणजे संत काव्यात अनेक मुस्लिम संत कवींच्या कविता पाहायला मिळतात. यामध्ये शेख महंमद यांचे 'योग संग्राम' हे महाकाव्य असून, त्यांनी संत साहित्याच्या परंपरेत अध्यात्म, भक्ती व वैराग्य व्यक्त केले. यासोबत शेख अहमद, शेख युसुफ व मलिक मुहम्मद या संत कवींनीही अभंग, ओव्या लिहिलेल्या आहेत. त्यामुळे हिंदू-मुस्लिम यांच्यात सांस्कृतिक संगम निर्माण झालेला पाहायला मिळतो.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात, स्वातंत्र्य, समाज सुधारणा व राष्ट्रीय चळवळ यातून काही मुस्लिम कवी पुढे आलेले पाहायला मिळतात व त्यांनी आपली कविता जी लिहिली आहे; त्यात भाई मदनी व काझी सय्यद यांच्या कविता देश,प्रेम व सामाजिक जाणीव व्यक्त करणाऱ्या वाटतात. स्वातंत्र्य उत्तर काळात, अर्थात आधुनिक कवितेत मुस्लिम कवींनी सामाजिक भान, वास्तववादी दृष्टिकोन, अस्तित्वादी प्रश्न मांडलेले दिसतात. यात अहमद नगरवाले व हबीब खान इत्यादींचा उल्लेख करता येतो. त्यांच्या कवितेमध्ये सांप्रदायिकता, गरिबी व उपेक्षा यांचे दर्शन घडते.

समकालीन कालखंडात मुस्लिम कवींनी आपला स्वतंत्र आवाज उठवलेला दिसतो; यात शफाअत खान यांनी नाटकासोबत आपल्या सामाजिक संघर्षाच्या कविता लिहून, अपेक्षित जगाचे चित्र उभे केले तर मोमीन, शेख पिंकी यांनी स्त्रीवादी कविता लिहून, आपल्या कवितेतून स्त्री जीवनातील दडपशाही, लैंगिकता, मुस्लिम स्त्रियांचे प्रश्न मांडले. यासोबतच आज रफिक शेख, नवाज मोहम्मद,

मुनवर शेख व गुलनाज इत्यादी अनेक कविंनी आधुनिक समाजातील मुस्लिम जीवन, स्थलांतर, बेघरपणा, धर्मांधता व उपेक्षा यांची नोंद आपल्या कवितेतून घेतली म्हणून मुस्लिम कवितेची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. हिंदू-मुस्लिम ऐक्य व मानवी मूल्ये यावर भर या कवितेतून दिला गेला.

२. सामाजिक वास्तव, दारिद्र्य, स्थलांतर, बेरोजगारी, स्त्रीजीवन व सांप्रदायिकता या विषयाची मांडणी पाहायला मिळते.

३. साध्या, सोप्या बोली भाषेतील ही कविता असल्याने, थेट वाचकाशी संवाद साधणारी, प्रभावी शैली व्यक्त करते.

४. दलित स्त्रीवादी, जनकविता या प्रवाहाबरोबर मुस्लिम कवींनी आपली स्वतंत्र वाट निर्माण केलेली या कालखंडात महत्त्वाची वाटते.

५. मुस्लिम मराठी कविता ही मध्ययुगीन संत परंपरेपासून समकालीन स्त्रीवादी व सामाजिक कविता प्रवाहा पर्यंत पोहोचलेली असून हिंदू-मुस्लिम, सांस्कृतिक संगमाचे दर्शन घडवणारी व उपेक्षितांच्या अनुभवाला वाचा फोडणारी अशी आहे.

**आदिवासी कविता :**

आदिवासी कविता ही आदिवासी जीवनाच्या, समाजाच्या अनुभवाला, जीवनपद्धतीला, संस्कृतीला, परंपरांना व संघर्षाला व्यक्त करणारी अशी असून ही कविता वरील प्रवाहापैकी वेगळी अशी आहे. तिचे इथल्या मातीशी, जंगलाशी, निसर्गाशी व लोकजीवनाशी खूप जवळचे नाते आहे.

या कवितेचे काही वैशिष्ट्य आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. ही कविता निसर्गाशी संबंध जोडणारी असल्याने, तिच्यातील निसर्ग, जंगल, डोंगर, नदी, प्राणी व पक्षी यांच्याशी खूप जवळचा संबंध दाखवणारी आहे व त्यामुळे हे सर्व प्रमुख घटक या कवितेत ओतप्रोत भरलेले दिसतात.

२. ही कविता सामूहिक लोकजीवनाचे प्रतिनिधित्व करणारी असल्याने, 'मी'पेक्षा इथे 'आम्ही'वर भर दिलेला आहे.

३. या कवितेतील संघर्ष हा विस्थापन, जंगलतोड, भूक, दारिद्र्य, शोषण व अन्याय यासोबतच विविध प्रश्नांचा वेध घेत असल्याने तो विचार करायला लावणारा असा आहे.

४. आदिवासी कवितेतून आपली परंपरा व संस्कृती अभिव्यक्त होत असताना आदिवासी नृत्य, गाणी, सण, उत्सव, विधी, देवदेवता व श्राद्ध या बाबींनाही चित्रित केल्या जाते. यातून आदिवासी परंपरा व संस्कृतीची ओळख पटते.

५. या कवितेची भाषाशैली ही बोलीभाषेचा वापर करणारी असल्याने साधी, सोपी, सहज पण ओजस्वी अशी आहे.

६. कवितेतील विद्रोह हा आपले हक्क, जमीन, पाणी व जंगल यांना वाचवण्यासाठी आलेला असून त्यातून प्रतिकार अभिव्यक्त होतो.

७. स्वतःची ओळख किंवा शोध घेणारी ही कविता असल्याने यामध्ये 'आपण आदिवासी असणे' ही एक ओळख निर्माण केली जाते.

या कवितेत मुख्यतः शरणकुमार निंबाळे, सुभाष शिरढोणकर, नंदा खरे व भुजंग मेश्राम अशी काही महत्त्वपूर्ण नावे सांगता येतात.

त्यांनी आपल्या कवितेतून लोकभाषा, बोलीभाषा, गोंडली, भिल्ल, कोळी, वारली व कोरकू इत्यादी समाजाच्या ओव्या व गीते यांच्या माध्यमातून ही कविता पुढे नेली.

**आदिवासी कवितेचे मुख्यतः** दोन प्रवाह अभ्यासाच्या सोयीसाठी मानले जातात ते पुढीलप्रमाणे -

१. **लोककाव्य / पारंपरिक :** यामध्ये सण, उत्सव, लग्न-गीते, विधी-गीते व निसर्ग गीते यांचा प्रामुख्याने समावेश केला जातो.

२. **आधुनिक आदिवासी कविता :** या कवितेतून विस्थापन, शोषण, पर्यावरणाची हानी, अस्तित्वासाठी दिलेली झुंज, जीवनातील संघर्ष व ताणतणाव इत्यादी पहावयास मिळतात.

थोडक्यात आदिवासी कविता ही १९८० नंतरच्या कालखंडात स्वतंत्र प्रवाह घेऊन निर्माण झाली व तिने आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यामुळे ती आधुनिक मराठी कवितेत महत्त्वपूर्ण आहे. तिचा स्वतंत्र अभ्यास करणे याचसाठी महत्त्वाचे ठरते.

**१९६० नंतरची मराठी कविता :** ही कविता नवीन सामाजिक जाणीव घेऊन येताना दिसते. १९६० नंतर अनेक कवी हे फक्त स्वतःच्या अस्तित्वपुरता विचार न करता समाजातील अन्याय, विषमता व शोषण या संदर्भात बोलताना दिसतात म्हणून या कवितेमध्ये जातीयता, वर्गसंघर्ष, स्त्रीप्रश्न, शहरीकरण, खाऊजा धोरण, स्थलांतर व राजकीय अस्थिरता प्रकर्षाने पहावयास मिळते.

१९६० नंतर ग्रामीण आणि दलित साहित्याची चळवळ उभी राहिल्याने त्यामध्ये अनेक कवींनी आपली कविता फुलवलेली दिसून येते. दलित साहित्यामध्ये बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, दया पवार, अरुण कांबळे व लक्ष्मण माने अशा अनेक कवींनी दलित

कवितेचे दालन विस्तीर्ण केलेले दिसते. त्यांनी आपल्या कवितेतून जातीव्यवस्थेवर प्रचंड हल्ला करून कित्येक वर्षापासून जे दलितांचे शोषण चालू होते; त्या शोषितांचा आक्रोश, बंडखोरी अभिव्यक्त केली व त्यामुळे ही कविता एका नव्या वळणावर गेली म्हणून या कवितेची उंची अनन्य साधारण अशी आहे.

याच काळात एकीकडे ग्रामीण कवितेत शेतकरी प्रश्न, समस्या व गावापासून दूर राहतांना ग्रामीण संस्कृतीत रुतलेली घट्ट नाळ या कवींची दिसून येते. तसेच या कवितेत 'शेतकऱ्याला कोणी वाली नाही!' अशी जाणीव होत राहते. अर्थात ही कविता शेतकऱ्यांच्या जीवनावर भाष्य करणारी अशी आहे.

यानंतर पुढील कालखंडात स्त्रीवादी कविता निर्माण झालेली दिसून येते, यात शांता शेळके, इंदिरा संत, ज्योती लांजेवार, अश्विनी धोंगडे, वृषाली किन्हाळकर, पिंकी शेख इत्यादी अनेक कवयित्री आपल्या कवितेत स्त्रियांचे दुःख, तिचे जगणे, दडपशाही, लैंगिक शोषण व स्त्री स्वातंत्र्याची भूक परखडपणे मांडताना दिसतात.

दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, भानू काळे, यशवंत मनोहर यांनी आपल्या कवितेची भाषा शैली, प्रतिमा रचना यामध्ये अनेक प्रयोग करून आपली कविता प्रयोगशील केलेली दिसून येते. पुढे जनकविता ही लोकाभिमुख झालेली पाहायला मिळते. या कवितेतून शोषित समाज, जनता कामगार, शेतकरी, स्थलांतरित यांचे वास्तव उलगडून ही कविता दाखवते. त्यामुळे ती अधिक लढाऊ, संघर्षशील व थेट वाचकाच्या हृदयाला पीळ पाडणारी वाटते.

या कवितेच्या शैलीतील बदल हा पारंपरिक गोडव्याऐवजी कटू, कठोर व थेट तितकाच उग्र वाटायला लागतो. या कवितेत मराठी, उर्दू, इंग्रजी व बोलीभाषेतील अनेक शब्द आलेली दिसतात

म्हणून ही कविता काहीशी गद्य मिश्रित असून, मुक्तछंदात लिहिलेली दिसायला लागते. या कवितेतून दलित कविता, ग्रामीण कविता, स्त्रीवादी कविता, प्रयोगशील कविता, जन कविता असे मुख्य प्रवाह आढळून येतात.

थोडक्यात १९६० नंतरची मराठी कविता ही नवकवितेच्या आत्मकेंद्री मर्यादापासून मुक्त झालेली पाहायला मिळते. या कवितेत सामाजिक, राजकीय, स्त्री-पुरुष समानता, दलितांचे प्रश्न, आंबेडकरांचा प्रभाव, शेतकरी प्रश्न, लोकजीवनातील संघर्ष यांना घेऊन ती पुढे येते व त्यामुळे वाचकाच्या हृदयाला थेट भिडणारी वाटते. भाषाशैलीने ती प्रयोगशील कविता वाटायला लागते पण या कवितेत जनसामान्यांच्या भावनांना महत्त्व दिलेले दिसून येते म्हणून ती समजून घेणे ही तितकेच महत्त्वाचे ठरते.

**२००० नंतरची मराठी कविता :**

या कवितेत जागतिकीकरण व तंत्रज्ञानाच्या प्रभावाने युक्त असल्यामुळे या कवितेत मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया अशा विविध ॲपचा केलेला वापर, माहितीचा विस्फोट व उपभोक्तावाद इत्यादी अनेक प्रतिमा पाहायला मिळतात. यामधील नवी पिढी ब्लॉग, फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युब व व्हाट्सॲप इत्यादीवर आपली कविता लिहिताना दिसतात म्हणून ती लघु कविता, दोन ओळीची कविता, मायक्रो पोएट्री, स्पोकन वर्ड पोएट्री व व्हिज्युअल पोएट्री यामुळे लोकप्रिय झाली असून वाचकांशी थेट संवाद साधताना दिसते. या कवितेतून डिजिटल एकाकीपणा, सोशल मीडियाचे व्यसन, नवी शहरी जीवनशैली, फास्ट फूड कल्चर, कार्पोरेट जीवन, बेरोजगारी व मेंदूवरचा ताण अभिव्यक्त करणारी असून यासोबतच पर्यावरणीय संकट पाणी टंचाई, ग्लोबल वार्मिंग व शेतकरी

आत्महत्या इत्यादी अनेक सामाजिक संवेदनशील विषयासोबतच स्मार्टफोन, नेटफ्लिक्स अशा ऑनलाइन प्रतिमा या कवितेत पाहायला मिळतात.

२००० नंतरच्या कवितेत दलित, बहुजन, स्त्रीवादी इत्यादी अनेक पैलूंना घेऊन ही कविता पुढे जाताना दिसते. ती तीव्र असल्याने वाचकाच्या मनाला स्पर्शून जाते. क्विअर (LGBTQ+) कविता लिंग ओळख, शरीर व राजकारण यावर ती भाष्य करते. यासोबतच अल्पसंख्यांक,आदिवासी व स्थलांतरित यांचे आवाजही बुलंद करते. भाषा शैलीतला या कवितेचा बदल  सांगायचा म्हणजे ती संवादात्मक, थेट, उग्र, विनोदी, मिश्र भाषा व बोलीभाषा यातून प्रगट झालेली दिसते. त्यामुळेच या कवितेत आधुनिक इमोजी, हॅशटॅग, डिजिटल प्रतीक यांचा प्रयोग भरपूर दिसून येतो म्हणून ही कविता प्रयोगशील असल्याने या कवितेला परफॉर्मन्स, ऑडिओ, व्हिज्युअल, व्हिडिओ, पोएट्री व स्लॅम पोएट्री अशी काही नावे नव्या रूपात आलेली दिसतात. पारंपरिक मुक्तछंदाबरोबर लघुरुप व तुटक गद्य या दृश्यात्मक मांडणीमुळे ही कविता लोकप्रिय होत आहे.

वाचक व लेखक यांच्यातील हे संबंध इथे पुस्तकापुरते मर्यादित राहिलेले नसून वेगवेगळ्या ॲपद्वारे या कवितेला प्रतिसाद मिळालेला दिसतो आहे. त्यामुळे ही कविता पब्लिक डोमेनमध्ये झपाट्याने जाताना दिसते. यामध्ये संदीप खरे हे तरुणाच्या भावविश्वाचा आवाज व प्रेमनाते संबंध जोपासताना दिसतात तर हेमंत दिवटे, सचिन कळसकर हे शहरी जीवन व प्रयोगशील असे आपले काव्य लेखन करतात. सोबतच वृषाली कुलकर्णी या स्त्री अनुभवाचे विविध पैलू सांगताना दिसतात. संजय सोनवणे, सुनील

अबबोळे हे बहुजन व सामाजिक वास्तव आपल्या कवितेतून अभिव्यक्त करतात. या कालखंडातील तरुण पिढीतील अनेक कवी हे इंस्टाग्राम व परफॉर्मन्स पोएट्री या मंचावर आलेले दिसतात.

थोडक्यात २००० नंतरची मराठी कविता ही डिजिटल माध्यमातून अभिव्यक्त झालेली संवादात्मक पण थेट वाचकाच्या मनाशी भिडणारी व विविध अनुभवाचे पैलू दाखवणारी, बहुविध विषयातील विषयाची चित्रे रेखाटणारी, प्रयोगशील कविता म्हणता येते व ती समकालीन वास्तवाशी घट्ट जोडलेली दिसून येते.

**समकालीन मराठी कविता :-**

समकालीन मराठी कविता ही साधारणत: १९९० नंतरची विशेषत: इ.स.२००० नंतर लिहिलेली कविता मानली जाते. ही कविता आधुनिक, उत्तराधुनिक, जागतिकीकरण, तंत्रज्ञान क्रांती, स्त्री-पुरुष समानता, दलित वंचितांचे प्रश्न, आंबेडकरवादी प्रवाह, पर्यावरण, खाऊजा धोरण, आदिवासी कविता व निसर्ग विनाश या सर्व बाबींवर भाष्य करते. या कवितेतून मुख्यतः जागतिकीकरणाचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे बाजारीकरण भांडवलशाही, उपभोगतावाद, नवे तंत्रज्ञान यांचा प्रभाव तिच्यावर पडलेला दिसतो. यासोबतच मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया या प्रतिमाही या कवितेत वापरलेल्या दिसतात. या कवितेला सामाजिक भान आहे. या कवितेत विविध प्रवाह मिसळलेले दिसून येतात. उदा, दलित, ग्रामीण, स्त्री, आदिवासी, भटक्या-विमुक्त व अल्पसंख्यांक या सर्वांचे प्रश्न या कवितेत केंद्रस्थानी असल्याने बहुजन वंचित समाजाच्या जगण्याशी ही कविता आपले नाते दाखवते. या कवितेतील स्त्रीवादी कविता हा भाग नवा असून यात स्त्रीचे अनुभव वास्तवात आलेले आहेत असे नसून तिचे शरीर, लैंगिकता, तिची

ओळख, आत्मसन्मानही ठोसपणे दिसतो आहे. पितृसत्ताक व्यवस्थेच्या विरुद्ध निर्भीड भाष्य ही कविता करताना दिसते. या कवितेतील भाषिक प्रयोग पाहताना बोलीभाषा, मिश्र भाषा म्हणजे मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू अशी मिसळ झालेली दिसते. या कवितेतील असभ्यता ही थेट शब्दात व्यक्त झाल्याने ही कविता बोलक्या स्वरूपाची, गद्य सदृश, तुटक व दृश्यात्मक आहे. समकालीन कवितेत नव्या-नव्या विषय वस्तू पाहायला मिळतात. यात स्थलांतर, बेरोजगारी, दहशतवाद, पर्यावरण-ह्रास, पाणीटंचाई, शेतकरी आत्महत्या, आधुनिक शहरी जीवनातील परकेपणा, बकालपणा, लैंगिकता, समलैंगिकता व क्विअर आयडेंटिटी पाहायला मिळते.

थोडक्यात समकालीन कविता म्हणजे जागतिकीकरणाच्या नंतरच्या, बदलत्या समाज व्यवस्थेतून उद्भवणारे बहुविध प्रश्नाचे, व्यक्ती स्वातंत्र्याचे, लैंगिक व ओळख राज्यकारणाचे डिजिटल संस्कृतीचे आणि मानवी अस्तित्वाच्या संकटाचे थेट, निर्भीड प्रयोगशील व कलात्मक अभिव्यक्तीकरण, चित्रीकरण करणारी अशी असून अशा प्रकारे आधुनिक मराठी कवितेचा प्रवास झालेला दिसून येतो.

# :: ऋणनिर्देश ::

बी.ए. प्रथम वर्ष 'आधुनिक मराठी कविता' (काव्यगाथा), अभ्यासपत्रिका-दुसरी या कवितेच्या पुस्तकातील १५ कवितांचा भावार्थ पुस्तकरूपाने आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होतो आहे! कविता वाचली की समजेलच असे होत नाही. बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा बौद्धिक आवाका लक्षात घेऊन हे पुस्तक भावार्थरूपाने आपल्यापुढे मांडताना मला अनेकांचे सहकार्य लाभले, त्यांच्या ऋणात राहणे मला आवडेल परंतु ज्यांचे सहकार्य अत्यंत मौलिक असे मला वाटते; त्यांचा नामनिर्देश करणे अत्यंत महत्त्वाचे वाटते म्हणून मी या पुस्तकाचे संपादक डॉ. कमलाकर चव्हाण, डॉ. संजय बालाघाटे व डॉ. व्यंकटी पावडे यांचे ऋण मी व्यक्त करते.

तसेच या ग्रंथासाठी मला ज्यांचे महत्वपूर्ण सहकार्य लाभले; त्यांचे शब्दात ऋण मानने मी माझे कर्तव्य मानते. प्रथमतः गुरुवर्य डॉ. साहेब खंदारे, प्रा. केशव वसेकर, प्राचार्य डॉ. विलास पाटील, प्रा. गणेश आवटे, प्रा. घोडकेसर, डॉ. वैद्यसर, प्राचार्य डॉ. विलास आघाव, डॉ. नवीन वसेकर, प्राचार्य डॉ. यशवंत खडसेसर, प्राचार्य डॉ. अजय टेंगसे, डॉ. जायभायेसर, डॉ. उमेश मुंढे, डॉ. सुनीता धर्मराव, डॉ. शारदा कदम, प्राचार्य डॉ.प्रभाकर कऱ्हाळे, डॉ. श्रीराम कऱ्हाळे, डॉ. लक्ष्मण वाघमारे, डॉ. नवघडेसर, डॉ. मंजुषा भटकर, डॉ संगीता मुंढे, डॉ. सविता व्हटकर (कोल्हापूर), प्राचार्य डॉ. शंकर मुंढे, प्रा. कवी वा. ना. आंधळे (जळगाव), श्री. खाडे भाऊ (बीड), डॉ. भास्कर बडे (लातूर), डॉ. सोमनाथ बिराजदार, डॉ. साईनाथ शेटूड, डॉ. सारिका औरादकर, डॉ. विशाल बेलूरे, प्रा. सदाशिव भुयारे, डॉ.जे.सी. पठाण, डॉ. सुनीता कांबळे, डॉ. नयना रत्नपारखी, उपमुख्याध्यापक सौ. विद्या लटपटे, प्रा. विद्या फड, सौ. सुमन गिनगीने व डॉ. नीता पतंगे आपल्या सर्वांच्या ऋणात मी राहू

इच्छिते. यासोबतच माझे आई-वडील सौ. गिरीजाबाई गणपतराव घुगे यांच्यामुळे माझ्या हाती लेखणी आली व मी काही तरी लिहिती आहे. माझा भाऊ व भावजय मला सतत प्रेरणा देतात; आपण काही तरी लिहीत राहा. ज्यांच्यामुळे मला सतत स्फूर्ती मिळत राहते. त्यात सौ. शारदा गजानन गणपतराव घुगे, माझ्या बहिणी सौ. सुनीता भगवान डोईफोडे व सौ. अनिता सदाशिव बुधवंत याही मला सहकार्य करतात. नव्हे- नव्हे त्याच माझ्या पुस्तकाच्या पहिल्या वाचक असतात. यासोबतच सौ. पल्लवी सचिन डोईफोडे, सौ.अंजली अक्षय डोईफोडे, सौ. शुभांगी मंगेश घुले, श्री. अभिजीत सदाशिव बुधवंत, श्री. निखिल विनोद कायंदे पाटील, चि. ओंकार गजानन घुगे व भक्ती गजानन घुगे ही माझी सर्व गुणी लेकरं ही मला लिहित करतात. यांच्याशिवाय मी अपूर्ण आहे. त्यांच्याही मी ऋणात आहे!

माझी मुलगी कु. संस्कृती राजेश बुधवंत जिच्यामुळे मी आज उभी आहे. ती माझी पहिली वाचक आहेच पण इथ अस लिहिल तर अजून छान वाटेल म्हणून स्पष्ट शब्दात खंकावून सांगणारी माझी लाडकी सोनपरी, जिच्यामुळे मला लिहिण्याची ताकद, (बळ) निर्माण होते. मला कंटाळा आला तरी आता लिहावेच लागेल असे मला वाटते. त्यामुळे तिचेही ऋण माझ्यावर आहेच!

कळत-नकळत कुणाचे नाव इथे राहिले असेल त्या सर्वांच्या ऋणात मी आहेच कारण आपल्या सर्वांच्या प्रेमामुळे व आशीर्वादामुळे मी लिहिते आहे. याबरोबरच या सिद्धी पब्लिकेशन हाऊस चे मालक सौ. पल्लवी राजेश उंबरकर यांनी या ग्रंथाला बोलके मुखपृष्ठ व साजेसे ग्रंथरूप दिले त्यांचे ही आभार व सर्वांच्या सहकार्याने मला हा ग्रंथ आपल्यापर्यंत आणता आला. तेव्हा आपल्या सर्वांच्या ऋणात राहणेच मला जास्त आवडेल!

# मनोगत

बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या हाती “आधुनिक मराठी कविता : भावार्थ” हे पुस्तक देताना मला मनस्वी आनंद होतो आहे; तसे पाहता कविता समजून घेणे मोठ कठीण काम असते. कवीला कवितेतून काय म्हणायचे? तेही लवकर समजेलच असे हे वय या विद्यार्थाचे नसते. कवितेचा सरळ-सरळ वाच्यार्थ निघत नाही. त्यामुळे लक्षणेने, व्यंजनेने कवितेचा अर्थ जाणून घ्यावा लागतो. बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शब्दशक्तीचे ज्ञान मनावे तेवढे नसते. तेव्हा त्यांच्यापुढे कवितेचा भावार्थ पुस्तकरूपाने जर सांगितला तर ती कविता त्यांच्या आकलनासाठी सोपी ठरेल असा एक मानस या पाठीमागे माझा आहे.

“आधुनिक मराठी कविता: भावार्थ” या पुस्तकामध्ये एकूण १५ कविता आहेत. त्या वेगवेगळया प्रवाहातून आलेल्या आहेत.त्यांचा भावार्थ सांगण्याचा प्रयत्न मी माझ्या पद्धतीने इथे केलेला आहे. यामध्ये कवितेची भाषा, कवितेचा विषय, कवितेत येणारी रूपक, प्रतिमा व प्रतीके उलगडून दाखविण्याचाही प्रयत्न केला आहे. जेणे करून ही कविता सहज समजू शकेल अशा भाषाशैलीचा म्हणजे बोलीभाषेचा वापर मी केलेला आहे. त्यामुळे या सर्वच पंधरा कविता भावार्थ रूपाने, सोप्या पद्धतीने मी मांडलेल्या आहेत.

'जेना देखे रवी, ते देखे कवी' या उक्तीप्रमाणे जे सूर्याला दिसत नाही, ते कवीला दिसते परंतु भावार्थ कवितेचा लिहिताना कवीचे बोलणे, लिहिणे हे वक्रोक्तीपूर्ण असल्याने काही उणीवा माझ्या असू

शकतात. माझ्या अल्प बुद्धीला जे अनुभवता आले ते मी या भावार्थ रूपाने व्यक्त केले आहे. विद्यार्थांना याचा  जास्तीत जास्त फायदा होईल हा माझा उद्देश आहे. कमी वेळात हा कवितेचा भावार्थ मी पुस्तकरुपाने मांडत आहे. सर्वांनी तो गोड करून घ्याल ही माझ्या मनीची इच्छा आहे. या पंधरा कविता वेगवेगळया कालखंडातील, वेगवेगळया प्रकारातील आहेत. त्या संदर्भात मी सविस्तर प्रास्ताविक दिलेले आहे. विद्यार्थ्यांना त्याचाही फायदा होईल.

आधुनिक मराठी कविता पदवी प्रथम वर्षाच्या ऐच्छिक मराठी विषयाचे जे विद्यार्थी आहेत, त्यांच्यासाठी विद्यापीठाने 'काव्यगाथा' हे पुस्तक संपादित केलेले असून यात निवडक पंधरा कविता घेतलेल्या आहेत. त्या इंग्रजी सत्तेच्या आगमनानंतर अस्तित्वात आलेल्या असून आजतागायत कवितेत झालेले बदल, प्रकार अभिव्यक्त करतात. समकालीन मराठी कवितेतही या कवितेची मुळे आढळतात. ‘सत्य सर्वांचे आधी घर’ हा अखंड महात्मा फुले यांचा असून यामध्ये शुद्राती शुद्राच्या मुक्तीचे द्वार शिक्षणाच्या माध्यमातून जे खुले झाले, त्यातून मानवी जीवनात सत्य आणि सदवर्तनाला महत्त्व असल्याशिवाय माणूस सुखी होणार नाही! असा विचार फुले व्यक्त करतात तर कवी केशवसुत यांनी सौंदर्यवादी भावकवितेची परंपरा मराठी काव्यात निर्माण केली. आत्मशोधनासह सामाजिक संवेदनशीलता व निसर्ग हा मानवी जीवनातील महत्त्वाचा भाग ज्यांनी मानला. या परंपरेतील महत्त्वाचे कवी रे. ना.वा. टिळक यांचीही कविता या पुस्तकात पाहायला मिळते.

आधुनिक कालखंडात महत्वपूर्ण काव्य लेखन करणारे बी उर्फ नारायण मुरलीधर गुप्ते यांची कविता व्यक्ती आणि सामाजिक

स्वातंत्र्याचा पुरस्कार घडवते. त्यांची 'माझी कन्या' ही कविता मध्यमवर्गीय सामाजिक जाणीवांचा विस्तृत आशय अभिव्यक्त करते. या कवितेत बाप व मुलीच्या हळव्या नाते संबंधावर प्रकाश पडतो. माधव जुलियन हे रविकिरण मंडळातील महत्त्वाचे कवी असून 'छंदरचना' आणि 'पद्यप्रकाश' या छंदशास्त्राचा अभ्यास करणारे ते प्रयोगशील कवी होत. त्यांची 'आमुची मायबोली' ही कविता मराठी किती ऐश्वर्य संपन्न व सामर्थ्यशील आहे. तिचा गौरव अत्यंत भावस्पर्शी शब्दात त्यांनी केलेला आहे. नवकवितेचे जनक म्हणून आपण सर्व बा.सी. मर्ढेकरांना ओळखतो. त्यांची 'भंगू दे काठिन्य माझे' ही कविता ईश्वराकडे सदविचाराचे मागणे मागणारी अशी आहे. कवी कुसुमाग्रजांनी विपूल अशा कविता लिहिलेल्या असून त्यांची उत्कट प्रेमजाणीव अभिव्यक्त करणारी कविता म्हणजे 'स्वप्नांची समाप्ती' होय.

साठोत्तरी मराठी कविता ही सामाजिक जीवन जाणिवांना अभिव्यक्ती करणारी, महानगरीय मध्यमवर्गीय समाजाचे चित्र व्यक्त करणारी असून दुसरीकडे भारतीय संविधानाने शिक्षणाचा सर्वांना दिलेला समान हक्क व नव्या जीवनमूल्यांच्या शोधातून ही कविता, विविध सांस्कृतिक, भाषिक अवकाश असलेली दिसून येते. स्वातंत्र्याच्यानंतर मराठी कवितेत आशयात्मक व भाषिक प्रयोग जे झाले, त्यात दलित-आंबेडकरवादी कविता, ग्रामीण कविता, स्त्रीवादी कविता, आदिवासी कविता, मुस्लिम कविता व महानगरी प्रांताची कविता असे विविध प्रवाह आढळून येतात. आधुनिक मराठी कवितेतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यामध्ये नारायण सुर्वे, ना. धों. महानोर, खलील मोमीन, जगदीश कदम, वाहरू सोनवणे, उत्तम कांबळे, प्रकाश मोगले, वृषाली किन्हाळकर व दिशा

पिंकी शेख अशा अनेक कवींची कविता पाहायला मिळते. त्यांच्या कवितेत वेदनेची जाणीव व पिचलेल्या वंचित जगाच दुःख पाहायला मिळते. वर्णवाद आणि वर्गवाद हाही या कवितेतून आढळून येतो. मानवी समूहाच्या दुःखाचे मूळ कारणही तोच दिसून येतो. स्वातंत्र्यानंतरची आधुनिक मूल्यजाणीवही या कवितेत वास्तववादी जीवनवादाने अनुभवता येते. यासोबतच कष्टकरी, कामगार जीवन, बकाल जगणं, वेदना, दारिद्र्य व दुःखही ही कविता अभिव्यक्त करते.

आदिवासी व आंबेडकरवादी या प्रवाहासोबतच मुस्लिम कविता ही एका मोठ्या मानवी समूहाच्या वेदनेला व जीवनाला शब्दांकित करते. यातून मुस्लिम संस्कृती तर विकसित होतेच परंतु यासोबतच या समूहातील माणसाचे, स्वातंत्र्यानंतरचे जगणे व विविध ताणतणावही पाहायला मिळतात. खलील मोमीन हे समकालीन कवितेतील महत्त्वपूर्ण कवी मानले जातात. त्यांची 'निरालय' ही कविता मानवी जीवनातील आदिम दु:खाचा शोध घेताना दिसून येते.

१९९० नंतर मराठी भावकवितेला पुढे नेणाऱ्या मराठी कवितेत वृषाली किन्हाळकर यांचे नाव घ्यावे लागते. त्यांच्या कवितेत स्त्रीजीवनातील वेदना व दुःख दिसून येते. 'मुंग्यांचे हरवत नाहीत आत्मसूर' ही त्यांची कविता स्वार्थी माणसांनी कायम मुंगीच्या कष्टाला डोळयासमोर ठेवून पुढे गेले तरच आपल्या जगण्याला काहीसा आकार येईल असा भाव व्यक्त करते तर चळवळ आणि कविता हे बलस्थान मानणाऱ्या, तृतीयपंथी जीवनाला एक आकार देणाऱ्या दिशा पिंकी शेख यांची 'टीव्हीवर सिनमा चालू होता' ही कविता वर्तमान समाजातील दाहक वास्तव अनुभव व्यक्त करते.

एकंदरीत अशा 'आधुनिक मराठी कविता' या बी.ए. प्रथम वर्षाच्या पुस्तकातील पंधरा कविता भावार्थासाठी मी घेतलेल्या असून त्यांचा सर्वोतोपरी भावार्थ मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. विद्यार्थ्यांसाठी हा भावार्थ शब्दबद्ध करण्याचा साधा, सोपा माझा प्रयत्न व मानस आहे!

**डॉ. संगीता ग. घुगे**
(मराठी विभाग)
शंकरराव चव्हाण महाविद्यालय,
अर्धापूर, जि. नांदेड.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | सत्य सर्वांचे आदि घर | महात्मा ज्योतिराव फुले | ३१ |
| २. | पांखरा! येशिल का परतून? | रें. ना. वा. टिळक | ३५ |
| ३. | माझी कन्या | कवी बी | ३९ |
| ४. | आमची मायबोली | माधव जुलियन | ४५ |
| ५. | भंगु दे काठिन्य माझे! | बा. सी. मर्ढेकर | ५१ |
| ६. | स्वप्नांची समाप्ती | कुसुमाग्रज | ५५ |
| ७. | कार्ल मार्क्स | नारायण सुर्वे | ६० |
| ८. | अक्षरे चुरगाळिता | ना. धों. महानोर | ६५ |
| ९. | निरालय | खलील मोमीन | ६९ |
| १०. | बेभरवशाचे जगणे | जगदीश कदम | ७३ |
| ११. | गोधड | वाहरू सोनवणे | ७७ |
| १२. | एक समूह | उत्तम कांबळे | ८१ |
| १३. | शिल्पकार ऐसा | प्रकाश मोगले | ८५ |
| १४. | मुंग्यांचे हरवत नाहीत आत्मसूर | वृषाली किन्हाळकर | ८९ |
| १५. | टीव्हीवर सिनमा चालू होता | दिशा पिंकी शेख | ९३ |

# १. सत्य सर्वांचे आदि घर

**- महात्मा ज्योतिराव फुले**

**परिचय:**

महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म १८२७ व मृत्यू १८९० मध्ये झाला. सत्यशोधक समाजाचे ते संस्थापक असून महाराष्ट्रातील एक कृतीशील थोर समाज सुधारक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी जे कार्य केले; त्यामध्ये प्रामुख्याने बहुजन समाजासाठी शिक्षणाची द्वारे प्रथम खुली केली. एक आदर्श शिक्षक ते प्रथम बनले. त्यासोबतच स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून त्यांची ओळख आहे. समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ट रूढी, प्रथा व परंपरा यांच्याविरुद्ध बंड पुकारण्याच कार्य त्यांनी केले.

एक थोर विचारवंत, शेतकऱ्यांचे कैवारी, शुद्रांसाठी लढणारे, शिक्षण प्रसारासाठी हंटर आयोगाच्यासमोर साक्ष देणारे, अबाल स्त्रियांना आधार देणारे महात्मा फुले हे उत्कृष्ट कर्ते सुधारक म्हणून ओळखले जातात. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्याचे ते खंदे पुरस्कर्ते होत. सामाजिक परिवर्तनासाठी त्यांचे क्रांतिकारी लेखन हे आजच्या समाजाला दिशा देण्याचे कार्य करते.

'गुलामगिरी', 'ब्राह्मणाचे कसब', 'शेतकऱ्यांचा आसूड' व 'सार्वजनिक सत्यधर्म' इत्यादी वैचारिक लेखन तर 'तृतीय रत्न' हे नाटक. 'शिवाजीचा पोवाडा' व 'अखंड' इत्यादी काव्यलेखन. अविद्येमुळे कसे दुःख माणसाच्या वाट्याला येते आणि हे दुःख जर दूर करायचे असेल तर शिक्षणाशिवाय माणसाला तरणोपाय नाही असे समाजाला प्रभावीपणे सांगणारे, महात्मा फुले हे आपल्या लेखणीतून प्रभावीपणे विचार व्यक्त करतात. दुःख, दारिद्र्याची

अभिव्यक्ती, शोषण व्यवस्थेला विरोध, आत्मभानाचे विचार, स्पष्टता व परखडपणा इत्यादी त्यांच्या लेखणीचे विशेष सांगता येतात.

प्रस्तुत 'सत्य सर्वांचे आधी घर' ही कविता त्यांच्या 'अखंड' या काव्यसंग्रहातील असून, यामध्ये सत्याचे सामर्थ्य कवी सांगतो आहे. मानवाचे सत्य वर्तन व सत्य आचरण जर असेल तर तो या जगात नेहमी सुखी व समाधानी राहू शकतो पण जर तो असत्याने वागत असेल तर त्याच्या जीवनात शांती नसते. मानवी जगण्यामध्ये हा सत्यवादीपणा असेल तर दांभिकपणा, कुप्रथा व धूर्तपणा दूर होऊन, या समाजामध्ये शांतता निर्माण करता येईल असा आशावाद कवी या कवितेत अभिव्यक्त करत आहे.

तसे ही कविता प्रबोधनपर असून, ओवी या छंदात लिहिलेली दिसते. यामध्ये सत्याचे महत्त्व व समाज सुधारणा कवीला करायची आहे! म्हणून सत्य हाच जीवनाचा पाया आहे. असत्य, दिखावा व अन्याय यांचा त्याग करणे, मानवी जीवनासाठी महत्त्वाचे आहे. सत्याचा स्वीकार केल्यास समाजात समानता, बंधुता व सामाजिक प्रगती साधता येते; असे कवीला मनोमन वाटते! म्हणून सत्य हे सर्व धर्मांचे मूळ आहे; असे कवी म्हणतो आहे. पुढे –

**"सत्य सर्वांचे आधी घर ॥ सर्व धर्मांचे माहेर**
**जगामाजी सुख सारे ॥ खास सत्याची ती पोरे"**

इथे सत्य सर्व धर्मांचा पाया आहे असे कवीने सांगितले असून, सत्याशिवाय कवीला हा धर्मच जो फुलेंचा आहे तो अधुरा आहे म्हणून सत्याशिवाय सुख, शांती व समाज सुधारणा करणे अशक्य आहे. त्यासाठी सत्याचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे. ज्यामुळे अज्ञान, अन्याय व असमानता नष्ट होईल व जगातील खरे सुख सत्यातच शोधता येईल; अशा सत्याची कास जीवनात आपण धरली

पाहिजे. असत्याने कोणाला कधीच सुख मिळत नाही! हे ही लक्षात घेतले पाहिजे.

या सत्यामध्ये प्रचंड ताकद असते. असत्य हे पोकळ व कमकुवत असते. सत्यावर आधारित व्यक्ती, धूर्त लोकांना पराभूत करू शकते. सत्याचे बळ पाहून वाईट प्रवृत्तीच्या मनात मत्सर व संताप निर्माण होतो म्हणजे त्याची एक प्रकारे ती हारच असते; याच संदर्भात फुले म्हणतात-

**"खरे सुख नटा नोव्हे ॥ सत्य इशा वरजू पाहे ॥**
**ज्योती प्रार्थी सर्व लोका ॥ व्यर्थ डंभा पेटू नका ॥"**

असत्यानी मिळणारे सुख हे कायमचे नसते, ते खोटे असते, टिकाऊ नसते. देवालाही सत्य आवडत असते म्हणून तो सत्यप्रिय असतो; तेव्हा सर्व लोकांनी ही ज्योतिरावांची प्रार्थना ऐकावी व अंगीकारावी असे ते शेवटी सांगतात.

अर्थात इथे फुलेंना खोटा दिलासा म्हणून असत्य कुठेही नको आहे. तेव्हा सर्वांनी सत्याचा स्वीकार केला पाहिजे असे ते वारंवार या कवितेत सांगत आहेत.

या अखंडामधून फुल्याची भाषा साधी-सोपी, ओघवती व तत्कालीन जनसामान्यांना समजणारी, ओवी छंदाचा वापर करणारी आहे.त्यामुळे ही कविता गेयात्मक आहे. तिला विशिष्ट चाल लावून गाता येते. या कवितेतील अलंकार म्हणजे सत्य सर्वांचे आधी घर, माहेर या शब्दामध्ये दिसून येते तर अनुप्रास म्हणून सत्य सर्वांचे या शब्दात दिसते आहे तर रूपक हे बळ सत्त्याचे पाहुनी या शब्दात कवीने मांडलेले आहे, तसेच प्रबोधन, दृढनिश्चय व समाजजागृती हे भावगुण ते सांगतात.

थोडक्यात या कवितेमध्ये तत्कालीन समाज व्यवस्थेतील अंधश्रद्धा, अन्याय, जातीभेद यांचा नाश करण्यासाठी महात्मा फुले यांनी हे चिंतनपर अखंड काव्य लिहून, लोकांची एक अर्थाने जागृती केलेली दिसते. त्यामुळे ही कविता सत्याचा संदेश सामान्य जनतेस देते व समाजात खरे परिवर्तन जर घडवायचे असेल तर सत्याचा स्वीकार करणे, मानवाचे आद्य कर्तव्य आहे व तेच ज्योतिबा फुले या काव्यातून वाचकांना समजावून सांगताना दिसतात.

***

# २. पाखरा! येशील का परतून?

**- रें. ना. वा. टिळक**

---

**परिचय :-** रें. नारायण वामन टिळक (जन्म १८६१, मृत्यू १९१९)

कवी रें. टिळक हे मराठीमधील केशवसुतपूर्व कालखंडातील महत्त्वपूर्ण कवी म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील करंजगाव येथे १८६१ साली झाला. आपली आई जानकीबाई यांच्याकडून त्यांना कवितेची पहिली ओळख झाली व पद्य रचनेतील गोडी आणि आवड देखील आईमुळेच निर्माण झाली. मराठी काव्यात त्यांना 'मुलाफुलां'चे कवी म्हणून ओळखले जाते. यासोबतच मराठी, संस्कृत, हिंदी व इंग्रजी या भाषांचे ते जाणकार होते.

'खिस्तायन', 'अभंगांजली', 'भजन संग्रह','बाप्पाचे अश्रू', 'सुबोध गीता', 'बालोघात', 'स्वराज्य हे खरे स्वराज्य', 'स्वराज्य आणि स्त्रिया' इत्यादी ग्रंथाचे लेखन. 'ऋषी ज्ञानोदय', 'काव्य कुसुमांजली' या मासिकाचे संपादक म्हणूनही त्यांनी काम केले. मुंबईमध्ये इ.स. १९१५ मध्ये भरलेल्या ११व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष पद त्यांना मिळाले. १८९५ मध्ये त्यांनी स्वतः ख्रिश्चन धर्म स्वीकारला व धर्मप्रचारक म्हणून पुढे अविरत कार्य केले. याच वेळी 'रेव्हरंड' ही खिस्ती धर्मातील उपाधी त्यांना मिळाली.

सहज साधी, सोपी व संस्कृत प्रचार भाषा त्यांच्या लेखणीची दिसून येते. त्यांच्या कवितेत काव्य, संगीत, नाट्य व गायन यांची सरमिसळ झालेली दिसते. यासोबतच व्यापक कुटुंब वत्सलता,

भावनोत्कटता व अध्यात्मिक जाणीव इत्यादी त्यांच्या कवितेचे विशेष सांगता येतात.

प्रस्तुत पाखरा! येशील का परतून? या कवितेत कवी आपल्या जिवलग व्यक्ती बद्दलची खंत व्यक्त करत आहेत. जेव्हा ही जिवलग व्यक्ती त्यांच्या जीवनातून कायम निघून जाते. तेव्हा कवी मनाला तिच्याविषयीचे झालेले अतिव दुःख व वेदनांचे चित्र या कवितेत अभिव्यक्त होते आहे. तसेच या कवितेतून वियोग, खिन्नता, शोकमग्न भाववस्था ही पाहावयास मिळते. त्यामुळे या कवितेत मनाच्या दुःखाचे चित्र हे गडद पाहायला मिळते.

'पाखरा! येशील का परतून?' या ओळीमध्ये कवी पाखराला उद्देशून बोलताना दिसतो पण ते पाखरू म्हणजे कवीची जिवलग व्यक्ती आहे. त्याला ती येण्याची अपेक्षा आहे म्हणून इथे 'पाखरा' हा शब्द व्यक्तीसाठी आलेला असून; तो प्रतिकात्मक आहे. ज्यातून आपल्या प्रिय व्यक्तीची आठवण किंवा संकेत म्हणून हा शब्द आलेला आहे. तसेच त्याचा तो प्रेमाचा दिलेला संदेश असून, त्याच्या त्या आठवणीतून, स्मृतीतून तो जिवलग व्यक्ती पुन्हा भेटेल अशी त्याला अपेक्षा आहे. इथे 'खुणातून' ही भावना किंवा जडतेने आलेला शब्द असून, तो अनुभवलेल्या आठवणीचा गहिरा अर्थ दाखवत आहे. निसर्गाच्या घटकाशी (हवे-सवे) मिसळून जाण्याची व स्वतःच्या अनुभवाशी ओळखून घेण्याची ती प्रक्रिया आहे. अर्थात इथे कवी आत्मिक व नैसर्गिक जोडणीच या शब्दातून व्यक्त करतो आहे. 'पाखरा' हा शब्द शैली व प्रतीक म्हणून अभ्यासताना तो मुक्त, चंचल, स्मृतीच्या भाषेचे प्रतीक म्हणून वापरला गेला आहे; तर हवे-सवे हे शब्द जीवनातील सौंदर्य व निसर्गाशी आत्मीय संबंध जोडणारे एक तत्त्व आहे. इथे नि:श्वास म्हणजे जीवनाचा श्वास असून, आत्म्याशी जोडलेला अनुभव आहे म्हणून तर कवी म्हणतो –

**“वाऱ्यावरचा तरंग चंचल । जाशील तू भडकून । पाखरा !**

**थांब येऊ दे रूप तुझे हे । हृदयी पूर्ण भरून । पाखरा !”**

वाऱ्यातील तरंगाप्रमाणे तू हलका, अस्थिर पण चपळ आहेस. कधीही अचानक तू दूर निघून जाशील याची त्याला भीती वाटत आहे! तेव्हा तू क्षणभर तरी इथे थांब! जेणे करून मी तुझ्या सौंदर्याचा, तुझ्या अस्तित्वाचा अनुभव घेऊ शकेल व तुझा संपूर्ण प्रतिमा भाव, प्रेम व आठवणी माझ्या हृदयात साठवून ठेवू शकेल! म्हणून हे पाखरा! तू थोडं थांब! असे कवी अगतिकपणे आपल्या जिवलग व्यक्तीशी इथे बोलतो आहे. यातून जीवनातील क्षणभंगुरता दिसून येते व जपून ठेवण्याची आसही दिसते आहे. पाखरा! हा शब्द पुन्हा-पुन्हा या कवितेत येताना दिसतो आहे.

तो इथे प्रिय अतिथी, जिवलग, सखा, जीवनातील एखादा सुंदर पण जो अल्पकाळ टिकणारे सुख अशा अर्थाने ‘रूपक’ म्हणून आलेला आहे. इथे जीवनाच्या प्रारंभीच्या क्षणाशी निगडित तो आला असून, प्रिय व्यक्तीच्या आयुष्यातील ती सुरुवात आहे. जन्मानंतरची पहिली अनुभूती किंवा एक व्यक्तिगत ओळख आहे. एखाद्या सूक्ष्म, नाजूक चिन्हाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न कवी करतो म्हणून तर तो ‘मजसवे’ म्हणजे लहान, हळुवार किंवा सूक्ष्म अनुभव सांगताना ‘चंचू’ची खुण म्हणजे एखाद्या प्रिय व्यक्तीची खासियत, ओळख किंवा जीवनात मागे सोडलेली काही चिन्हे होत! या कवितेमध्ये ‘पाखरा’ हा एक शब्द प्रतीक तर आहेच पण तो स्वातंत्र्य, हलकेपणा किंवा आत्म्याशी सूचक शब्द म्हणून आलेला आहे. तो मानवी मनोभाव दर्शवितो आहे म्हणून तो जन्मापासूनच कवीच्या जीवनात ओळखीचा आहे.

कवितेच्या शेवटच्या दोन ओळीतून एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर होणे किंवा अलविदा होणे किती अवघड असते; ही भावना इथे

कवी व्यक्त करत आहे.तर ‘परी’ हा शब्द इथे प्रेम, काळजी व स्नेहाच प्रतीक म्हणून आलेला आहे, ‘अमर्याद जग’ म्हणजे जीवनाचा अथक प्रवास कसा असू शकतो? त्यातील अनुभवांचे असंख्य क्षण ते आहेत, ‘जपून पाखरा’ यातून क्षण, आठवणी व भावनांचे लहानसे प्रतीक हे कवीला पाखरासारखे हलके व मुक्त दाखवायचे आहे. अर्थात या दोन ओळी अत्यंत भावनीक अशा आहेत! म्हणून तर कवी सहज म्हणून जातो की, ‘ये आता घे शेवटचे हे I अश्रू दोन पिऊन! पाखरा!!’ यातून पाखराला कवी शेवटच्या वेदनेचा, दुःखाचा व भावनांचा अनुभव देण्यासाठीची विनंती करत आहे. ज्यातून ‘दोन अश्रू पिऊन’ म्हणजे दुःखाची, शेवटची सावली जी आहे ती हलकी व स्वच्छ अशी वाटते आहे! ती पाखराने येऊन प्यावी असे त्याला वाटत आहे!

थोडक्यात ही कविता पाखराच्या प्रतीकातून, जीवनातील संवेदनशील, हलके, स्वच्छ व मुक्तीचे स्वरूप विशद करते. या कवितेत जीवनातील वेदना, अलविदा व विविध स्मृतीचे मिश्रण हे अत्यंत प्रभावकारी असे आलेले आहे. या कवितेतील ‘पाखरा’ हा शब्द पुन्हा-पुन्हा येत असून, तो भावनांचे वाहक, अश्रूंना पिऊन घेणारा पण प्रतीकात्मक व भावनात्मक म्हणून आलेला आहे!

***

# ३. माझी कन्या

- बी

**परिचय:-** कवी बी. नारायण मुरलीधर गुप्ते हे त्यांचे संपूर्ण नाव – (जन्म १८७२ व मृत्यू १९४७)

मराठीतील एक महत्त्वपूर्ण कवी म्हणून कवी 'बी' कडे पाहिले जाते. त्यांचा जन्म विदर्भातील 'मलकापूर' या गावी झाला. सामाजिक, कौटुंबिक व ऐतिहासिक अशा विविध विषयांवर त्यांनी आपले काव्य लेखन केले आहे. केशवसुतानंतर मराठीमधील एक महत्त्वपूर्ण कवी म्हणून त्यांची ख्याती आहे. तेज आणि स्फूर्तीने त्यांची कविता भरलेली असून, जुन्या-नव्या रचना वैशिष्ट्यांनी ती समृद्ध आहे.

त्यांचे 'फुलांची ओंजळ', 'पिकले पान' हे दोन काव्यसंग्रह असून, यासोबतच काही गद्य लेखनही त्यांच्या नावावर आहे. काव्य रसिकांना मंत्रमुग्ध करण्याचे सामर्थ्य त्यांच्या काव्यात असून, ऐतिहासिक कथाकाव्यही त्यांचे लोकप्रिय आहे. मराठीमध्ये दीर्घ कविता लिहिणारे कवी म्हणूनही ते सुप्रसिद्ध आहेत. त्यांची कविता विद्यापीठाच्या व शालेय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट झालेली आहे.

प्रस्तुत कवितेत गरिबीमुळे आपल्या मुलीचा अपमान झालेला असून तेव्हा तिची एक वेगळीच अवस्था या कवितेतून कवी सादर करत आहे. यामध्ये आपल्या मुलीची समजुत तिचे वडील काढत असताना त्यांच्या मनातील पितृ हृदयातील, वात्सल्यभाव कसा प्रगट होतो आहे? ते कवीने शब्दबद्ध केले आहे. अर्थात ही कविता पिता व मुलगी यांच्यातील एक भावनाते दाखवणारी, तितकीच लक्षवेधी आहे!

या कवितेतील पहिल्याच कडव्यात कवी म्हणतो की,'गाई पाण्यावर काय म्हणुनी आल्या?' अर्थात माझ्या मुलीच्या डोळयात पाणी का आले? जे गंगा, यमुनासारखे पवित्र या बापाला वाटत आहे व ते गंगा, यमुना या नद्यांना मिळालेले त्यांना दिसत आहे म्हणजे इथे कवी गाय, पाणी, गंगा व यमुना या शब्दाचा वापर प्रतीक म्हणून करताना दिसतो आहे. ज्याप्रमाणे गावात पाण्याचे महत्व गंगा, यमुनाच्या नद्यांचे असते अगदी त्याचप्रमाणे या कवितेतील बापाला आपल्या मुलीच्या डोळयातील अश्रूचे महत्व वाटत आहे. ते अश्रू त्याला इतके पवित्र व स्वच्छ वाटत आहे की त्याची पूर्ण जाणीव या बापाला आहे. आपल्या पूर्वजांच्या पुण्याईमुळे ही मुलगी आपणास लाभलेली असून, तिच्यासोबतचे प्रत्येक क्षण या बापाला आपल्या आयुष्यात महत्त्वाचे वाटत आहेत. ती बापाचे 'चित्त चोरणारी मुलगी' आहे. तेव्हा त्यांना ही गोरी, निरागस आपली कन्या का रडते आहे बरं? तिला कोण टोचून बोलले आहे? असे या बापाच्या मनात प्रश्न येत आहेत.

ज्याप्रमाणे उन्हाच्या तीव्र उष्ण वाऱ्यामुळे काश्मिरातील गुलाब पण सुकतो! त्याचप्रमाणे कोणी तरी अपमानित आपल्या मुलीला बोलल्यामुळे माझी ही सुंदर, नाजुक मुलगी आज सुकलेली आहे. खरे तर प्रत्येकाच्या जीवनात सुखाचे, दुःखाचे क्षण हे येतात, कधी ते मनाला लागून जातात तर कधी ते आनंद देऊन जातात. अगदी त्याचप्रमाणे माझ्या मुलीच्या मनाला हे अपमानित बोल लागल्यामुळे ती रडते आहे! ज्याप्रमाणे स्वर्गीय बागेतील वेली या वाऱ्याने हलायच्या असतात पण त्यांना पाणी नसेल तर त्या सुकतात. तसेच माझ्या छबिलीचे झालेले आहे! ही माझी देखणी, चपळ मुलगी कुणाच्या बोलण्याने दुःखी झाली आहे? पण कोणत्याही संकटात तुझी मूळ ओळख कोणीही पुसू शकत नाही! असा संदेश या

कवितेतील बाप आपल्या मुलीला देत आहे. मुळात येथे गंगा व यमुना यातून पवित्रता, शुद्धता दिसून येते तर गुलाब या शब्दात सौंदर्य, कोमलता पहावयास मिळते. इथे 'वल्लरी' म्हणजे वेली हा शब्द नाजूकपणा, लवचिक जीवनाचा अर्थ सांगत आहे. त्यामुळे या दोन्ही कडव्यातून करुण रस, वासल्य रस व शांत रस दिसून येतो आहे.

निसर्ग व मानवी जीवनाचे साधर्म्य किंवा साम्य वेगवेगळया उदाहरणातून कवी इथे सांगून जीवनाचे सत्य ही तिला सांगतो आहे. "कोण माझ्या बोलले" हे शब्द पुनरुक्ती निर्माण करणारे असल्याने, ते कवितेत पुन्हा-पुन्हा येत असून; यातून बापाची आत्मीयता विशद होत आहे! त्यामुळे या कवितेतील शब्दात कुठेही बापाचा उपदेश दिसून येत नाही तर हे शब्द सौम्य, हळुवार आधार देणारे असे आहेत व ही बापाची भाषा संवेदनशील हृदयाची आहे! त्यामुळे वाचकाच्या मनाला ती जाऊन भिडते कारण यात वडिलांच्या हृदयातील मुलीसाठीची माया, तिच्या वेदना समजून घेण्याची संवेदनशीलता व आयुष्याचे सत्य सांगण्याचे सुंदर भाव कवितेत प्रगट झाले आहेत. कवितेतील निसर्ग केवळ या अनुषंगाने कवीने उभा केला असून तो पुढे म्हणतो की,

**"शुभ्र नक्षत्रे चंद्रे चांदण्याची – दुड रचलेली चिमुकली मन्याची**
**गडे भुईवर पडे गडबडून - का ग आला उत्पात हा घडून"**

इथे कवीने मुलीच्या सौंदर्याबरोबर आकाशातील नक्षत्राची व चंद्राची तुलना केली आहे म्हणून ही मुलगी म्हणजे चंद्र प्रकाशात चमकणाऱ्या शुभ्र मोत्याच्या माळे समान या बापाला वाटत आहे. तर 'गडे भुईवर, पडे गडबडून' हा अलंकार असून हे सौंदर्य आपल्या मुलीचे जणू या जमिनीवर पडत आहे. ते विखुरलेले आहे म्हणजेच तिचा झालेला अपमान व मानसिक आघात पाहून वडील तिची

वेदना समजून घेताना सहज म्हणतात की हा उत्पात म्हणजे अपमान का घडून आला?

इथे या शाळेत तर विभा, विमला, आपटे व प्रधानांच्या अर्थात श्रीमंत घरातील कुलीन कन्या अनेक आहेत व त्यांच्यासोबत ही अशा घटना घडतात का? पण या श्रीमंत घराण्यातील कुलीन कन्या असल्यामुळे, त्या चैत्रातील गौर (देवता) ज्याप्रमाणे सजविली जाते. त्याप्रमाणे या मुली रेशमी पोलकी म्हणजे पारंपरिक पोशाख अंगावर घालून शाळेत येतात; यातून त्यांची श्रीमंती दिसून येते; तसेच सौंदर्य कुलीनता, शील ही स्त्रियांची अर्थात मुलींची आभूषणे आहेत पण मान-अपमानही जीवनात प्रत्येकाला येतच असतात तेव्हा आपल्या मुलीने स्वतःला कधीच कमी समजू नये. या वास्तव परिस्थितीची जाणीव हा बाप करून देत आहे.

आपल्या मुलीचे सौंदर्य चंद्र,चांदण्या, मोत्याच्या माळीप्रमाणे असून; चैत्र गौरीचे सजणे म्हणजे पारंपरिक सौंदर्य इथे अभिव्यक्त होत आहे. त्यातून कलात्मक तुलना व उपमा कवी शब्दात वापरताना दिसतो आहे. हा सामाजिक संदर्भ कवीने वापरून, कुलीन घराण्यातील मुलींच्या रेशमी वस्त्राला, श्रीमंतीचा संदर्भ जोडलेला आहे. चैत्र गौर, रेशमी पोलकी, छीटे हे शब्द ग्रामीण, सांस्कृतिक सौंदर्याची झलक म्हणून येताना इथे दिसतात. हे वडील आपल्या मुलीला अपमानाचा सूड घेण्याची भाषा न बोलता अंत:करणातून सहानुभूती व मुलीच्या सौंदर्याची स्तुती करून, तिच्या मनात अपराधीपणाची भाषा न निर्माण करता, तिला अत्यंत संयमी शब्दातून धीर देताना दिसतात.

इथे वडील आपल्या मुलीला समजून सांगताना म्हणतात की, तुला पाहून जर मुली लंकेची पार्वती समान तुला लेखतील! म्हणजे इथे लोक तुला सुंदर पण लंकेच्या पार्वतीसारखी म्हणजे कुठलेही

आभूषणे नसलेली मुलगी म्हणून कौतुकाने पाहतील! त्यातच एखादी व्यक्ती इरशेमुळे तुला कमी लेखून भिकारीण म्हणून अपमानित करील कारण शाळेतील मुली ह्या चतुर असतात व त्या मुली तू नकोशी म्हणून तुला कुणी टोचून बोलतील, कठोर बोलतील पण हा त्यांचा मानवी स्वभाव आहे. तो मनाला लावून घ्यायचा नाही. शहाण्या माणसाने अडाणी, रागातून बोललेल्या, शब्दांना महत्त्व देऊ नये! या कडव्यात 'लंकेची पार्वती' हे उपमा व प्रतिक म्हणून आलेले शब्द आहेत; यातून सौंदर्य व सन्मानाच्या प्रतीकाबरोबर अपमानाचे प्रतीक म्हणून 'भिकारीण' हा समाजातील टोचणारा शब्दही दिसून येत आहे! अर्थात इथे तुलना व विरोधाभास याबरोबरच कौतुक व अपमान यांना एकत्रित कवी वापरताना दिसतो आहे. इर्षा, कटोती व लहानवयातील टोमणे मारण्याची प्रवृत्ती या समाजात खूप आहेत.

कवीचे सामाजिक निरीक्षण अत्यंत सूक्ष्म असे येथे दिसून येत आहे. तेव्हा या जीवनाचे सूत्र कवी पुढे सांगताना म्हणतो, "शहाण्याने ते वेड्याचे शब्द म्हणून सोडून द्यायचे असतात व आपल्या मनावर त्याचा परिणाम होऊ द्यायचा नसतो!" वास्तव जीवनातील हा कटू अनुभव आहे; यातून बाहेर पडण्याचा मानसिक आधार हा बाप इथे मुलीला देताना दिसतो आहे म्हणजे इथे फक्त बापाचे सांत्वनपर शब्द नाहीत तर ते स्वाभिमानही राखण्याचा धडा देणारे शब्द आहेत म्हणून तर कवी म्हणतो ---

**"रत्न, सोने मातीत जन्म घेते - राजेश्वर निजशिरी धरी ते**

**कमल होते पंकात, तरी येते - वसंतश्री सत्कार करायाते"**

मौल्यवान रत्न किंवा सोने हे जमिनीतूनच बाहेर येते पण नंतर ते राजाच्या मुकुटात शोभून दिसते व तो मुकुट राजाला शोभून दिसतो. मातीचा उगम रत्न, सोन्याचा असला तरी त्याचे मूल्य कधीच कमी होत नाही. तसेच कमळ जरी चिखलात उगवत असले तरी वसंत ऋतु त्याचा स्वीकार करते तेव्हा परिस्थिती कितीही

अवघड, बिकट असली तरी सौंदर्य व पवित्रता टिकतच असते. चिखलाशी संपर्क आल्यामुळे कमळ कधी भिकारी होत नाही. धुळीशी संपर्क आल्यामुळे रत्न ही कधी भिकारी होत नाही अगदी त्याचप्रमाणे एखाद्या घटकाच्या सहवासामुळे संपूर्ण समुहाचा दर्जा कमी होत नाही. मग माझ्यामुळे जर तुला कोणी भिकारी म्हटले तर तू भिकारी कशी होशील किंवा असणार बरे? असा प्रश्न या कवितेतील बाप आपल्या मुलीला येथे विचारतो आहे. त्यामुळे 'गाई पाण्यावर येणे' इथे बापाला योग्य वाटत नाही.

या कवितेत मुख्य रस हा वात्सल्य रस असून, यासोबत शांत व वीर रस हे गौण रस म्हणून येताना दिसतात. तसेच अनेक प्रतिकांचा वापर कवी कलात्मकरीत्या जो करतो आहे. ते या कवितेच्या वैशिष्ट्यांच्या अनुषंगाने आलेले दिसून येते. उदा. रत्न, कमळ इत्यादी.

शेवटी जीवनाचे सूत्र जे कवीने विशद केले ते म्हणजे उगम किंवा परिस्थितीवरून मानवी जीवनाचे मूल्य ठरत नाही तर आपल्यातील गुण, स्वभाव व आंतरिक सौंदर्यावरून मानवी मूल्य ठरत असते. वडील हे  आपल्या मुलीला तिचा आत्मसन्मान परत देताना दिसून येत आहेत. जीवनातील प्रतिकूल प्रसंग तिच्या व्यक्तिमत्वाची किंमत कमी करत नाही तर निसर्गातील सुंदर व प्रभावी प्रतिमांची उदाहरणे वापरून, वाचकाच्या मनातही तत्त्वज्ञानाची शिकवण खोलवर रुजवतात अशा प्रकारे ही कविता पितृ हृदयातील वासल्य भाव व्यक्त करणारी आहे!

***

# ४. आमुची मायबोली

**- माधव ज्युलियन**

**परिचय:-**

माधव ज्युलियन यांचे पूर्ण नाव माधव त्र्यंबक पटवर्धन असून त्यांचा जन्म 'बडोदा' येथे इ.स.१८९४ मध्ये झाला तर मृत्यू इ.स.१९३९ ला झाला. माधव ज्युलियन हे त्यांचे टोपणनाव होय. विसाव्या शतकातीच्या सुरुवातीचे एक प्रयोगशील कवी, कोषकार, छंदशास्त्राचे व्यासंगी अभ्यासक, साहित्य विमर्शक व मराठी भाषा शुद्धीचे तत्त्वनिष्ठ पुरस्कर्ते इ. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक विशेष सांगता येतात.

फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे व राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथे ते फारशी व इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते तसेच रविकिरण मंडळाचे संस्थापक सदस्यही होते.

'स्वप्नरंजन', 'तुटलेले दिवे' हे त्यांचे कवितासंग्रह. 'विरहतरंग', 'सुधारक', 'नकुलालंकार' ही खंडकाव्य असून 'गजलांजली' हा गजलसंग्रह व 'भाषाशुद्धी विवेक' इ. ग्रंथ त्यांच्या नावावर असून भा.रा. तांबे यांच्या कवितांचे संकलन व संपादन त्यांनी केलेले आहे.

'गझल' व 'रूबाई' हे काव्यप्रकार सर्वप्रथम फारसीमधून मराठीत आणण्याचे श्रेय त्यांना जाते.'छंदोरचना' हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ असून यासाठी मुंबई विद्यापीठाची 'डी. लीट' पदवी त्यांना प्राप्त झालेली आहे! मुंबई विद्यापीठाची पहिली 'डी.लीट' पदवी त्यांची होय व ती त्यांना मिळालेली आहे! 'भाषाशुद्धी विवेक' जो त्यांचा ग्रंथ आहे, यात कालबाह्य ठरलेल्या शेकडो मराठी शब्दांची सूची समाविष्ट त्यांनी केलेली आहे.

इ.स.१९९६ मध्ये जळगाव येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्थान त्यांनी भूषविलेले आहे! स्वातंत्र्य, प्रेम शांती व प्रयोगशीलता इत्यादी त्यांच्या लेखणीचे विशेष सांगता येतात; तसेच शेले व ब्राउनिंग यांचे ते चाहते होते. या पाश्चिमात्य कवीचा त्यांच्या काव्यलेखनावर फार मोठा प्रभाव दिसून येतो. याशिवाय शेलेच्या 'ज्युलियन' आणि 'मडालो'वरूनच त्यांनी 'ज्युलियन' हे नाव स्वतःला लावलेले आहे.

'आमची मायबोली' या कवितेतून कवीने मराठी भाषेचे सामर्थ्य व सौंदर्याचा अत्यंत समर्पक शब्दात गौरव केलेला दिसतो. मराठी ही आपली मायबोली असून तिचे स्थान आपल्या हृदयात आहे. तिला विश्वामध्ये प्रतिष्ठा व वैभव प्राप्त करून देण्याचा विचार या कवितेतून कवीने मांडलेला आहे. थोडक्यात या कवितेत मराठीचा दर्जा व महत्त्व सांगण्याचा प्रयत्न कवीने केलेला आहे.

मराठी ही आमुची मायबोली जरी असली तरी तिला राजभाषा म्हणून मान्यता त्या काळात नव्हती. त्यामुळे तिला म्हणजे माझ्या माय मराठीला आज ऐश्वर्य नाही परंतु पुढे मात्र दिव्य आशा कवीने तिच्याविषयीची व्यक्त केली आहे व तिच्या या यशासाठी इथे कवी माय मराठीला स्वतःची मायबोली मानतो आहे. तिच्याविषयी कवीच्या मनात प्रचंड प्रेमभाव व अभिमान आहे! तो कधीच कमी होणार नाही माझ्या माय मराठीला पंचखंडात अर्थात संपूर्ण जगात मान्यता मिळावी असाही दिव्य आशावाद कवीचा इथे पुन्हा- पुन्हा दिसून येतो आहे. आज इंग्रजी भाषेची सत्ता व श्रीमंती जरी वाढली असली तरी देखील मराठीच्या पोटी जन्माला आल्याचा अभिमान कवी बाळगतो आहे. तिची परिस्थिती आज जरी भिकारीणीसारखी वाटत असली तरी मातृभाषेच्या कुशीतून कवी कधीच स्वतःला दूर करणार नाही किंवा दूर जाणार नाही.

कवीला मराठी भाषेची प्रचंड ओढ आहे परंतु तिच्या सध्याच्या परिस्थितीबद्दल कवी मनाची खंतही व्यक्त होत आहे. तिच्या भविष्यातील उज्वलतेची आकांक्षा यांचा संगम कवी व्यक्त करत आहे. अर्थात माधव ज्युलियन यांची राष्ट्रभाषा, प्रेमाची भावना इथे दिसून येते आहे. ती वाचकाला आपल्या मातृभाषेबद्दल आदर, जपवणूक व उन्नतीची प्रेरणा देत आहे; ही मराठी भाषा ओजस्वी, प्रेरणादायी व राष्ट्रभाषा व प्रेम व्यक्त करणारी असल्याने, ती प्रादेशिकतेपलिकडे जाऊन, मराठीचे वैश्विक मूल्ये सांगताना कवी म्हणतो की.......

**"जरी मान्यता आज हिंदीस देई,उदेले नवे राष्ट्र हे हिंदवी,**
**मनाचे मराठे मराठीस ध्याती, हिची जाणुनी योग्यता, थोरवी**
**असू दूर पेशावरी उतरी, या असू दक्षिणी दूर तंजावरी,**
**मराठी असे आमुची मायबोली, अहो, ज्ञानदेवीच देखाखरी"**

इथे हिंदीला राजमान्यता आहे म्हणून काय झाले? हे नवे राष्ट्र जे हिंदवी निर्माण झालेले आहे त्यात मराठी मनाचे लोक आपल्या ध्यानी,मनी मराठीच वापरतात व त्यामुळे तिची योग्यता, थोरवी खूप मोठी आहे. ही मायमराठी सकल मराठ्यांची असून, जे मराठे कुठेही असले तरी उदा. पेशावर, उत्तरेकडे, दक्षिणेस किंवा तंजावर तरी तिची गोडी अविट आहे म्हणून आज राष्ट्रभाषेचा दर्जा किंवा मान जरी हिंदीला मिळाला असला तरी मराठी भाषा ही मनाच्या पातळीवर श्रेष्ठ मानणारे लोक इथे आहेत. या मराठीची मान्यता व थोरवी किंवा ज्ञान संपन्नता जाणणारे लोकही इथे खूप आहेत. आपण जरी पेशावरपासून, तंजावरपर्यंत कुठेही असलो किंवा राहिलो, गेलो तरी मराठी हीच आपली मायबोली असणार यात शंका नाही म्हणूनच कवी मराठीला 'ज्ञानदेवी' म्हणून गौरवतो आहे! तिच्यात

प्रचंड ज्ञानसंपदा दडलेली आहे व ही भाषा बोलायला, लिहायला पण सोपी आहे परंतु भावनांनी ती ओथंबलेली आहे. या मातृभाषेच्या गौरवासाठी नाट्यमय व आवाहनपर शैलीचा वापर करताना कवी इथे रूपक म्हणून 'ज्ञानदेवा' हा शब्द वापरतो. जो मराठीत मानवीरूपातील गौरव उदगार असून, उपमा ही अप्रत्यक्षपणे मराठीचा, इतर भाषांशी तुलना संबंध दर्शवित असली तरी तिच्यात श्रेष्ठत्वाची जाणीव आहे. हिंदीला मान्यता व मराठीची अंत:करणातील मान्यता यांचा विरोधाभासही कवी इथे अभिव्यक्त करतो आहे.

ही माय मराठी आमची असली तरी तिचा प्रवासा भिन्न धर्मातील अनुयायांच्यासोबतचा आहे. त्यामुळे तिच्या अंतरंगात बंधुत्वभाव निर्माण झालेला आहे म्हणून तिच्या एका ताटात आम्ही सर्व जण बसलेले आहोत. अर्थात आम्ही सर्व तिचे पुत्र होत. त्यामुळे तिचे पांग आम्हाला फेडायचे आहेत. आमच्या हृदयाच्या मंदिरात अशी भावना प्रज्वलित झालेली आहे की आज ना उद्या हिला जगमान्यता मिळविण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करू! आपल्या मायमराठीला वैभवाच्या शिखरावर बसवण्यासाठी आम्ही सर्व जण प्रयत्न करून या मराठीचे ऐतिहासिक व सांस्कृतिक वैभव वाढवू जेणे करून या भाषिकांचा भौगोलिक विस्तार वाढेल. आपण मराठी भाषिक अनेक धर्माचे असलो तरी आपली मातृभाषा आपणा सर्वांना एकत्र बांधून ठेवणारी आहे! त्यामुळे आपल्या अंत:करणात बंधुत्वभाव असल्याने तिची मनोभावे सेवा करण्यासाठी सदैव मन मंदिरात ती वास करेल! आपल्या सामर्थ्याने तिला जगभर मान्यता मिळवून देऊन, वैभवाच्या शिखरावर तिला बसवू असा आशावाद कवी कवितेत प्रगट करतो आहे. भाषिक एकात्मता, बंधुता व

वैभवाच्या आकांक्षा अतिशय समर्पक शब्दात कवी येथे व्यक्त करत आहे.

हिच्या अंगावरची, सौंदर्याची झलक इतकी नाजूक व मनमोहक आहे की ती फक्त पाहण्यापूर्ती नसून तिच्या गोडसर रूपाची साक्ष देणारी व हृदयात आनंद, लज्जा वाटणारी परंतु तिच्या सौंदर्याचे आदरपूर्वक दर्शन घेण्याची भावना कवी मनात येथे दिसत आहे. तिचं रूप इतकं प्रभावी आहे की तिची सुंदरता ही अप्सरा आली तरी तिला मागे टाकणारी आहे असे कवीला वाटत आहे! अगदी महागडे हिरे, मोत्याचे दागिने जरी कुणी घातले तरी तिचे नैसर्गिक सौंदर्य कमी होत नाही कारण तिचं सौंदर्य मुळातच स्वाभाविक व मोहक आहे. त्यामुळे तिच्या सौंदर्याचे व आधाराचे वर्णन कवी करून ही आपली मातृभाषा मराठी आहे असे सांगतो आहे व तिचा अभिमान व्यक्त करत आहे. अशा तिच्या नैसर्गिक, वास्तविक सौंदर्याचे, कौतुक अनेक शब्दांनी करण्यापेक्षा फक्त बडबड करणेही इथे व्यर्थ आहे!

शेवटी मराठी भाषेच्या प्रेमाचे व तिच्या उपेक्षेवरील वेदनेचे दर्शन कवी सांगताना म्हणतो की आपली ही मातृभाषा परकीय राज्य व परकीय संस्कृतीच्या अधिपत्याखाली आली असल्याने थोडी विस्कळीत व उपेक्षित झाली आहे; त्यामुळे ती थकलेली आहे. या मराठी भाषेच्या सांस्कृतिक व साहित्यिक संपत्तीला लोकांच्या दुर्लक्षामुळे तिचे गंभीर नुकसान होत आहे. त्यामुळे ती काळाच्या खोल, अंधाऱ्या पाण्यात गमावल्यासारखी वाटत आहे तरी माझ्या मराठीला महानतेच्या प्रतीकांचा शोध घेऊन, तिच्या उच्च मंडळीमध्ये तिला ठेवायचे आहे जेणे करून तिची मूळ संपत्ती व संस्कृती टिकून राहील व त्यामुळे तिचे ज्ञानही वाढत राहील.

थोडक्यात ही कविता मातृभाषेचे प्रेम व्यक्त करणारीच नव्हे तर सामाजिक व धार्मिक ऐक्याचा उच्च संदेश देणारी आहे! त्यामुळे

या कवितेतून एकात्मतेचे दर्शन होते व धार्मिक भिन्नतेवर मात करून ही आपली मातृभाषा ऐक्य निर्माण करताना दिसते. त्यामुळे मराठी भाषेचे एकत्रीकरण व सामर्थ्य दिसून येते. या भाषेच्या उन्नतीसाठीची निष्ठा व सेवाभाव हा भावनिक व प्रेरणादायी असा आहे. या कवितेतील विविध रस हे भाषा प्रेम, एकात्मता, आनंद, अभिमान, एकता, निष्ठा व कृतज्ञता असे दृढनिश्चय सांगणारे आहेत. यातील प्रतिमा, प्रतीके व अलंकार हे मानवीकरणाच्या वैभवाची साक्ष देतात. त्यामुळे येथे एकात्मतेचे प्रतिकात्मक दर्शनही होते. जगातील इतर भाषांपासून काही घेण्याची किंवा काही बंधन टाकण्याची इथे मुळीच आवश्यकता नाही म्हणून ही मायमराठी ठसठशीत आहे व त्यामुळे तिचे मूल्य हे जगापुढे आपण सर्वांनी राखले पाहिजे असे कवी जाणीवपूर्वक सांगत आहे.

'आमुची मायबोली' ही कविता मातृभाषेच्या प्रेमाचे उत्कट दर्शन घडविते तर इंग्रजीच्या प्रभावाच्या काळातही आपली कास धरते व आत्मसन्मान कायम ठेवते! आशा व दृढ निश्चय यांचा सुरेख संगम या कवितेत दिसून येतो. शिवाय विविध रूप व विरोधाच्या प्रभावी वापरामुळे अर्थगर्भता या कवितेची वाढलेली आहे. या कवितेत मुख्यतः शृंगार रसाचा संयोग भाव आलेला नसून शांतरस मुख्य आहे व त्यात वीररसाची छटा मिसळलेली आहे. इथे मराठीला 'माऊली' हे रूपक वापरलेले असून या सोबतच तिची श्रीमंती व भिकारी म्हणणे यात विरोध व्यक्त होत आहे; उपमा म्हणून 'मराठी असे आमुची मायबोली' म्हणजे इथे मायबोलीशी तुलना आहे.

थोडक्यात ही कविता रूपक, ओघवती भाषा, प्रतीके व लयबद्धता यामुळे वाचकांच्या मनाची पकड घेते व मराठी भाषेबद्दल अभिमान निर्माण करते म्हणून तिचे महत्त्व व आपल्या जीवनातील तिचे स्थान महत्त्वपूर्ण आहे!

***

# ५. भंगू दे काठिण्य माझे !

**- बा. सी. मर्ढेकर**

**परिचय –**

'भंगू दे काठिण्य माझे' ही कविता बाळ सिताराम मर्ढेकर यांची आहे. त्यांचा जन्म इ.स.१९०९ मध्ये झाला व मृत्यू इ. स.१९५६ मध्ये झाला. मर्ढेकरांना मराठी कवितेचे जनक म्हणतात याला कारण म्हणजे जगात जेव्हा दुसरे महायुद्ध झाले व त्याचा फटका संपूर्ण जगाला सहन करावा लागला. या औद्योगीकरणात मानवी जीवन व त्यांचे अस्तित्व धोक्यात आले; या बदलामुळे मानवी जीवनावर खूप मोठा परिणाम घडून आला. तसाच तो साहित्यावरही दिसून येतो; याची नोंद प्रथमतः मर्ढेकरांच्या कवितेत पाहावयास मिळते. 'शिशिरगम', 'काही कविता', 'आणखी काही कविता' इत्यादी काव्यसंग्रह. 'तांबडी माती', 'रात्रीचा दिवस व पाणी' इ. कादंबऱ्या प्रसिद्ध. 'आर्ट्स अँड मॅन' (कला आणि माणूस), 'वाङ्मयीन महात्मता, 'सौंदर्य आणि साहित्य', 'नष्टश्रेष्ठ आणि इतर एकांकिका इत्यादी ग्रंथ प्रकाशित.

त्यांच्या कवितेतून एक प्रकारची निराशा व वैफल्य पहावयास मिळते; त्याचे कारण म्हणजे दुसऱ्या महायुद्धात मानवाची झालेली हानी किंवा मानवी संहार हे होय. आपल्या कवितेत कवी अर्थपूर्ण आशय व अभिव्यक्ती यांचा सुसंवाद हा नव्या प्रतिमांचा वापर करून दर्शवितो आहे. इ.स.१९५६साली त्यांच्या 'सौंदर्य व साहित्य' या ग्रंथाला 'साहित्य अकादमी पुरस्कार'ही प्राप्त झाला आहे. शालेय व विद्यापीठ अभ्यासक्रममध्ये त्यांच्या साहित्याचा समावेश आहे. अभिनव व भाषा प्रयोग त्यांच्या काव्याचा महत्त्वपूर्ण विशेष सांगता येतो.

'भंगू दे काठिण्य माझे' या कवितेत आपल्यातील अहंकार, वाईट विचार गळून जावा, मनातील द्वेष  नष्ट व्हावा; यासाठी जीवनातील आघात सोसण्याचे धैर्य प्राप्त व्हावे अशा सद्विचाराची प्रार्थना कवी ईश्वराकडे करताना दिसतो आहे. मानवी जीवनातील कठोरता म्हणजे काठीण्य, संकुचितपणा नष्ट होऊन, स्वच्छ समाजमन निर्माण व्हावे, ते संवेदनशील असावे; असा दृष्टिकोन या कवितेत कवीने अभिव्यक्त केला आहे! म्हणून तर कवी सुरुवातीलाच म्हणतो –

**"भंगू दे काठिण्य माझे - आम्ल जाऊ दे मनीचे**
**येऊ दे वाणीत माझ्या - सूर तुझ्या आवडीचे"**

अर्थात इथे कवीच्या अंतरंगातील कठोरता, आम्लता (कटूता), मलीनता नष्ट होऊन; त्या ठिकाणी सौंदर्य, माधुर्य, प्रेमभावना व सृजनशक्ती यांचे बीज निर्माण व्हावे अशी प्रार्थना ईश्वराजवळ कवी करत आहे. माझ्या मनातील कठोरता किंवा कटूता दूर जाऊ दे व माझ्या वाणीला तुझा दैवी आदर्श म्हणजे आवडीचे मधुर सूर लाभू दे! माझ्या अंत:करणातील मलीनता गळून पडू दे व तुझ्या प्रेरणेतून नवीन स्फूर्तीचे बीज अंकुर दे! असे कवी इथे म्हणत आहे.

माझ्या बोलण्यात खरी स्वतंत्रता निर्माण होऊन, माझे हे शब्द तुझ्या श्वासातून निघालेल्या अक्षराचे रूप असू दे, माझ्यातला मत्सर, द्वेष जळून खाक होऊन, माझ्या भाषेला तेज अर्थात सामर्थ्य लाभू दे, माझ्या कृपणतेचा त्याग होऊन, माझ्या भावनांचा लाभ सर्वांना कळू दे, माझ्या विचारांना ज्ञानशास्त्राची कठोर कसोटी लाभू दे व माझ्या दुर्बलतेऐवजी तुझ्या तपाचे सामर्थ्य वाढू दे; हे माते स्वरूप देवी, तुझ्या प्रेरणाशक्तीमुळे, तुझ्या हृदयातील स्पंदने; ही माझ्या शब्दातून दिसू दे! अर्थात इथे कवी स्वतःच्या आत्मशुद्धीची प्रेरणेची व

दिव्यशक्तीची एकरूपता निर्माण होण्यासाठी; ईश्वराजवळ प्रार्थना करतो आहे. त्याला स्वतःच्या कटुतेचा, मत्सराचा, दुर्बलतेचा त्याग करून, माधुर्य, सामर्थ्य, तेज, सार्वत्रिक भावनाशीलता व सृजनशीलतेचा जणू तो वर मागतो आहे.

तुझ्या दैवी स्मृतीची ओळख माझ्या हाती येऊन; जीवनाचे सुखानू म्हणजे नियंत्रण मला मिळू दे! माझ्या स्वभावात अर्थात कृतीत, वृत्तीत शांती व मोठेपणाचे प्रयत्नशील सद्गुण येऊ दे! माझ्यात तुझ्या पवित्र इच्छांची तळमळ असू दे. लोकांची दुर्दैवी लालसेची म्हणजे लोभाची ओढ मात्र माझ्यात येऊ देऊ नकोस. माझ्या नजरेवर वाईट आकांक्षाची झापड पडू देऊ नको. जीवनात जे जे पहावे लागणार आहे; ते पाहताना धैर्य माझ्यात येऊ दे व यासोबत नम्रताही असू दे. माझी ही बुद्धी पोलादासारखी कठोर व मजबूत होऊ दे, जेणे करून ती संकटाचे आघात सहन करील व इंद्रियाच्या माध्यमातून जगाचे अनुभव घेता; येण्यासाठी माझ्या अनुभवांनी, माझ्या अंतरंगाला तू ताकद दे! तेव्हा पुढे कवी म्हणतो –

**“आशयाचा तूच स्वामी - शब्दवाही मी भिकारी**
**मागण्याला अंत नाही - आणि देणारा मुरारी”**

म्हणजे इथे इंद्रियाच्या माध्यमातून, इंद्रियाचा अर्थ, जीवनाचा गूढ असा आहे.तूच तर खरा स्वामी या जगाचा आहेस असे कवी म्हणतो आहे; तेव्हा मी शब्दाचा भिकारी असून, माझ्या मागण्याला कुठेही अंत नाही पण देणारा तूच आहेस! अर्थात तू मुरारी म्हणजे जगाचा कृष्ण आहेस; तेव्हा मी तुला काय मागावे? हेच मला कळत नाही. तुम्ही काय द्यावे? हे तुम्हालाच ठाऊक आहे! ते ठरविण्याचा अधिकार मला नाही कारण देणारा तू सर्वश्रेष्ठ आहेस पण मी घेणारा स्वभावतः देखील तूच आहे! मी मात्र इथे निमित्य साधन व्यक्ती आहे.

थोडक्यात या कवितेत कवी दैवी शक्तीशी एकरूप होण्याची प्रार्थना करताना दिसतो आहे. त्याला आयुष्याचे सुकाणू नीट हवे आहेत पण ते स्वतःच्या अहंकाराने नव्हे तर देवाच्या स्मरणाने. त्याला इथे धैर्य, नम्रता, शांती व सद्‌गुण असे गुण हवे आहेत; ते स्वीकारण्यासाठी या मनुष्याच्या अमर्याद अशा मर्यादा आहेत पण देणारा व घेणारा हा एकच असून; त्यालाच ईश्वर म्हणता येईल! हा परमेश्वर खूप दयाळू आहे. लोकांमध्ये असणाऱ्या दुर्दैवी लोभ व लालसेमुळे तो दूर राहून, दैवी इच्छांच्या तळमळीला कवीला ईथे कवटाळावयाचे आहे. आपले डोके हे चुकीच्या मार्गाने जाऊ नये व आपली बुद्धी पोलादासारखी कणखर व्हावी; जेणे करून जीवनातील सर्व आघात आपणास पैलता येतील असे बळ कवी मागत आहे.

इंद्रियाच्या माध्यमातून जगाचे अनुभव घेत असताना; अंत:करणाची शुद्धता राखण्याची कवीची आकांक्षा फार मोठी आहे. जीवनाचा खरा अर्थ इंद्रियातील सत्याचा स्वामी ईश्वर म्हणजे देव आहे! तो अत्यंत कृपाळू असून, तो सर्वांना देण्याचे कार्य करतो! हे सत्य कवीला इथे उमगले आहे म्हणून तर कवी स्वतःला भिकारी म्हणतो कारण माणसाच्या मागण्याला अंत नाही! हे देवाला माहीत आहे. इथे देणारा व घेणारा दोन्ही समान आहे. अर्थात तोच देव आहे! त्यामुळे आपल्या सर्व आकांक्षा, आपल्याकडेच तो सोपावतो म्हणून तो सत्याचा स्वामी आहे! अर्थात या कवितेत आत्मशुद्धी, संयम, धैर्य व नम्रता या प्रेरणेची प्रार्थना कवी करत आहे! माणसाच्या इच्छा अंतहीन आहेत.त्या शेवटपर्यंत न संपणाऱ्या आहेत! अर्थात एक आधुनिक दृष्टिकोन कवी बाळगून ही कविता लिहितो आहे म्हणून ही कविता एक उत्तम प्रयोगशील कविता आहे; असे आपणास शेवटी म्हणता येईल.

***

# ६.स्वप्नाची समाप्ती

**- कुसुमाग्रज**

**परिचय :-**

कवी कुसुमाग्रज म्हणजे विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्म इ.स.१९१२ साली झाला; असून मृत्यू इ.स.१९९९ साली झाला. ते काव्यात 'कुसुमाग्रज' या टोपणनावाने लेखन करतात. मराठी साहित्यातील सुप्रसिद्ध लेखक, कवी म्हणून त्याची ख्याती आहे. त्यामुळे त्यांचे लेखन कविता, कथा, कादंबरी व नाटक अशा विविध वाड.मय प्रकारात पहावयास मिळते.

'जीवनलहरी', 'विशाखा', 'किनारा', 'समिधा', 'मेघदूत', 'मराठी माती', 'स्वगत', 'हिमरेषा', 'वादळवेल' व 'मुक्तायन' इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध. 'दुसरा पेशवा', 'ययाती आणि देवयानी', 'वीज म्हणाली धरतीला' व 'नटसम्राट' इत्यादी नाट्यलेखन. 'जान्हवी', 'वैष्णव' व 'कल्पनेच्या तीरावर' या कादंबऱ्या प्रकाशित. 'फुलवाती', 'सतारीचे बोल आणि इतर कथा', 'काही वृद्ध, काही तरुण' हे कथासंग्रह तर 'शेक्सपियरच्या शोधात' हा समीक्षा ग्रंथ प्रकाशित आहे. त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहास 'ज्ञानपीठ' पुरस्कार प्राप्त आहे व 'नटसम्राट' या नाटकास 'साहित्य अकादमीचा पुरस्कार' प्राप्त झाला आहे. इ.स.१९६४ साली 'मडगाव' येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व मानवता या लोकशाही मूल्यांचा पुरस्कार, आशावादातून आलेली भव्योदातता, क्रांतीवादी दृष्टीकोन, निसर्ग व प्रेमभावनांचा तरल काव्यात अविष्कार, ओजस्वी

प्रतिमायुक्त भाषाशैली इत्यादी त्यांच्या लेखनीची वैशिष्ट्य सांगता येतात.

प्रस्तुत 'स्वप्नांची समाप्ती' ही त्यांची लोकप्रिय कविता असून; यामध्ये मानवी प्रेमानुभूतीचा उत्कट अविष्कार पहावयास मिळतो. या कवितेतून आलेला सुंदर निसर्ग प्रतिमांमुळे यातील आशय, अधिक भावस्पर्शी व लालित्यपूर्ण झालेला आहे. कर्तव्यापुढे सर्व काही शून्य आहे. तेव्हा कर्तव्य, काम यातील एक महत्त्वपूर्ण टप्पा या कवितेचा विषय आहे. या कवितेत रात्र, स्वप्न, चांदण्याचा प्रकाश, निसर्गातील निरवता व पहाटेचे आगमन यांचा अद्वितीय प्रयोग कवीने करून; जीवनातील स्वप्नदृष्टी व वास्तव यांच्यातील संघर्ष मांडलेला आहे.

कवितेच्या सुरुवातीस रात्रीचे सुंदर, सोज्वळ व शांत चित्रण दिसून येते. काळया आकाशातील चमकती तारे, यासोबत मंद दिसणारा शुक्रतारा, स्वप्नासारखे अस्तित्व, पाखरांचे थांबलेले गाणे, झोपलेल्या रात किड्याची निरवता या सर्व प्रतिमातून ही रात्र म्हणजे स्वप्नाचे विश्व वाटायला लागते. तेव्हा या स्वप्नाच्या दुनियेत कवीला आपल्या प्रेयसीच्या हातातील, चांदण्याचे हात स्पर्श करून जातात व त्यामुळे त्या स्वप्नात त्याला आशा, प्रेम, ध्येय व सौंदर्याची अनुभूती मिळते परंतु ही रात्र जेव्हा संपते व पहाट सुरू होते. गार वारे वाहू लागतात. पानाची सळसळ ऐकू येते. प्राजक्ताची फुले गळून खाली जमिनीवर पडतात व हळूहळू जगाची सुरुवात होते. अर्थात इथे या स्वप्नाच्या दुनियेतून माणसाला वास्तवात यावे लागते. हे वास्तव कठीण वाटू लागते. मग काय बैलासारखी ओढाताण, घुंगराच्या आवाजासारखा श्रमाचा नाद, आकृती, रंग व जगातील विविध हालचाली पाहायला मिळतात.

स्वप्नातील चंद्रप्रकाश संपून जातो. त्या जागी दिवसाचे दूत म्हणजे प्रकाश, वास्तव जग, कठोर प्रसंग, कर्तव्य व समाजाचे निरनिराळी आव्हाने निर्माण होतात; हा दिवस म्हणजे फक्त प्रकाश नाही तर लक्षावधी लोकांचे सत्यजीवन, मोठमोठ्या जबाबदाऱ्या असून; या सर्व गोष्टी त्याला संघर्ष वाटायला लागतात. तेव्हा त्याचा जो वेडेपणा असतो, स्वप्ने पाहणारा, तो सर्व बाजूला जाऊन, अपराधीपणाची जाणीव त्याला होते; म्हणून तर कवी म्हणतो –

**“काढ सखे, गळ्यातील - तुझे चांदण्याचे हात**
**क्षितिजांच्या पलिकडे - उभे दिवसाचे दूत”**

जीवन फक्त स्वप्नाच्या सुंदर दुनियेत घालविण्यासाठी नसून; ते स्वप्नांना वास्तवाशी घडवण्यासाठी आहे! हे जर माणसाला कळले नाही; तर ते सर्व स्वप्न तुटून जातात! माणसाने आपले प्रेम, ध्येय, आशा या शब्दांना कठोर परिश्रम व वास्तवातील संघर्ष यात उतरविले पाहिजे; यातून ‘स्वप्नाची समाप्ती’ म्हणजे मानवी जीवनाची खरी पहाट किंवा जिथे स्वप्नांची खरी कसोटी लावावी लागते; त्यासाठी केलेला प्रयत्न होय.

रात्र व स्वप्न सृष्टी, दिवस व वास्तव यांच्यातील संघर्ष या कवितेत पाहावयास मिळतो. या स्वप्नाच्या मोहक दुनियेत, सौंदर्य, प्रेम, ध्येय व आशा प्रत्येकाकडे असते पण पहाट झाली की ते जीवन कठोर, संघर्षात्मक व कर्तव्यदक्ष असे जबाबदाऱ्यात मिसळून गेलेले दिसून येते. तेव्हा कवी म्हणतो, “स्वप्नांचा शेवट, हा पहाटेच्या प्रकाशात होत असतो.” या कवितेत विविध प्रतिमासौंदर्याचा वापर कवीने केलेला आहे. उदा. स्वप्नांचे रूपक म्हणून ‘सखे, गळ्यातील’, ‘तुझे चांदण्याचे हात’ हे स्वप्नाच्या सौंदर्याचे प्रतीक म्हणून येते तर ‘ स्वप्नात एकतारा विरे’ यातून स्वप्न हे क्षणभंगुर असते; हे ही दिसून येते! निसर्ग प्रतिमा म्हणून ‘काळे मेघ’, ‘मंदावणारा शुक्रतारा’,

'प्राजक्ताची फुले', 'गवतावरील दवबिंदू' व 'स्वप्नसृष्टी' ही पहाटेची लय पकडणारी प्रतिमा वाटतात. श्रम प्रतिमांमध्ये 'खळयामधील बांधलेले बैल' ही वास्तव जीवनातील कठोर श्रमासाठी वापरलेली प्रतिमा म्हणून येते तर 'गळयातील घुंगराचा नाद' हे संघर्षाचे, जगण्याचे, दैनंदिन चक्र म्हणून पहावयास मिळते. प्रकाश प्रतिमा ही प्रकाशाच्या पावलांची हालचाल दाखवते व पहाटेच्या किरणाचा विजय म्हणून दिसून येते तर 'ध्वज त्याचे कणकाचे' यामध्ये विजयाचे वास्तवाच्या आगमनाचे प्रतीक म्हणून पहावयास मिळते.

या कवितेत विविध अलंकार जे येतात; त्यात रूपक, उपमा व अनुप्रास या अलंकारातून चांदण्याचे हात, प्रकाशाचे दूत, स्वप्नासम तारा, प्रकाशाच्या पावलाची चाहूल यामुळे यमक तर साध्य होतेच पण यामुळे या कवितेस तालबद्धता प्राप्त होते. सतत आलेली पुनरुक्त शब्द, काही ओळीमुळे गेयता साध्य होते. उदा. काढ सखे, गळयातील - तुझे चांदण्याचे हात!

या कवितेत येणाऱ्या भावरसामुळे शृंगाररस, शांत रस, करुण रस, वीर रस यातून; रात्रीच्या सुरुवातीला प्रेयसी, चांदणे व स्वप्न यांचे सोज्वळ दर्शन शृंगाररसामुळे वाचकाला होते तर शांत रसामुळे रात्रीची निरवता, दव, प्राजक्त व झोपलेले रातकिडे यांची ओळख पटते. करूण रसातून स्वप्नभंग पहावयास मिळतो परंतु यासाठी वास्तवात कष्ट करण्याची तयारीही सांगितली जाते. वीर रसामुळे 'ध्वज त्याचे कनकाते' यातील आग ही वास्तवाशी लढण्यासाठी प्रेरणा देऊन जाते.

शेवटी जीवन हे क्षणभंगुर आहे, खरी पहाट म्हणजे कर्तव्य, संघर्ष, जबाबदाऱ्या, जीवनाचे कठोर सत्य आहे म्हणून माणसाने फक्त स्वप्नरंजन न करता; त्यांना वास्तवात उतरवण्यासाठी प्रयत्न

केला पाहिजे. हेच सत्य जीवनाचे सार आहे व हीच खरी स्वप्नाचे समाप्ती आहे! म्हणून तर स्वप्नाच्या मोहक दुनियेतून वास्तवातील कठोर जीवनाकडे जाणारा प्रवास अतिशय महत्त्वाचा आहे व तो कवीने इथे कलात्मक असा मांडला आहे; यातून येणारी प्रतिमासौंदर्य, अलंकाराची उधळण, भावनांचा विविध रंग व तत्वज्ञानाची छटा यामुळे ही कविता वाचकाच्या मनाला अलगद स्पर्शून जाते. अर्थात ही कविता जीवन व संघर्ष यांच वास्तव सांगणारी असून; यातून कवीने स्वप्न पाहायला तर सांगितले परंतु कठोर परिश्रम वास्तवात उतरवत असताना जबाबदाऱ्या ही महत्त्वाच्या असतात हे ही सांगितले आहे; त्याला सोडून कुणालाही जगता येत नाही असे  ही आवर्जून सांगितलेले आहे.

***

# ७.कार्ल मार्क्स

**- नारायण सुर्वे**

---

**परिचय:-** नारायण गंगाधर सुर्वे (जन्म १९२६ – मृत्यू २०१०)

नारायण सुर्वे हे कामगारांचे भावविश्व चिंतनाच्या पातळीवर मांडणारे मराठीतील दलित कवी होत. त्यांनी आपल्या प्रभावी संवाद शैलीमधून उपेक्षित, श्रमिकांचे अंतरंग कवितेतून अभिव्यक्त केले आहे. या सोबतच साम्यवादी विचारही मांडला आहे.

'ऐसा गा मी ब्रह्म', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'सनद, व 'नव्या माणसाचे आगमन' इत्यादी काव्यसंग्रह प्रसिद्ध. 'गवसलेल्या कविता' या नावाने त्यांच्या ज्या अप्रकाशित कविता होत्या. त्या विजय तपास यांनी प्रकाशित केल्या. 'माणूस, कलावंत आणि समाज', 'कहाणी कविते'ची इत्यादी लेखसंग्रह. 'तीन गुंड आणि सात कथा', 'दादर पुलाखालची मुले' हे अनुवादित ग्रंथ प्रकाशित. 'दलित काव्यदर्शन', 'कविता श्रमाची', 'गाणी चळवळीची', 'कॉम्रेड डांगे : भारतीय राजकारणातील वादळ' इत्यादी संपादित ग्रंथ. नारायण सुर्वे यांच्या कविता ह्या गुजराती, हिंदी, उर्दू, कन्नड व इंग्रजी या भाषात अनुवादित आहेत.

१९९५ साली परभणी येथे झालेल्या ६८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते, पहिल्या कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. सांगली येथील दलित – ग्रामीण भागात आदिवासी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले; यासोबतच शासनाच्या पद्मश्री पुरस्कारासह, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्काराने ते सन्मानित होते! त्यांना अनेक नामवंत संस्थांचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

आपल्या कवितेतून कामगाराचे दुःख, वेदनादग्ध जीवन अत्यंत सहज त्यांनी मांडलेले आहे. त्यामुळे त्यांची कविता ही समूह मनाशी संवाद निर्माण करणारी आहे.

'कार्ल मार्क्स' ही कविता 'जाहीरनामा' या काव्यसंग्रहातील असून; यात कामगाराच्या कल्याणासाठी थोर विचारवंत कार्ल मार्क्स यांनी जो विचार मांडला, तो कामगाराचे जीवन बदलून टाकणारा व त्यांचे दुःख, दारिद्र्य दूर करणारा असा होता; इथे ही कार्ल मार्क्स व नारायण सुर्वे यांच्यातील वैचारिक सामर्थ्य दिसून येते म्हणून तर कवी कवितेच्या सुरुवातीस म्हणतो –

**"माझ्या पहिल्या संवादातच - कार्ल मार्क्स मला असा भेटला,**
**मिरवणुकीच्या मध्यभागी - माझ्या खांद्यावर त्याचा बॅनर होता"**

इथे कवीच्या पहिल्याच संपात मार्क्स त्यांना भेटतो. अर्थात ही प्रत्यक्ष भेट नाही पण त्याच्या विचाराच्या, बॅनरच्या आणि आंदोलनाच्या माध्यमातून तो कवीला भेटतो आहे; हेच विचार सुर्वे यांचे देखील आहेत. मग ते बॅनर खांद्यावर घेऊन चालणाऱ्या कवीला असे वाटते की कार्ल मार्क्स हा आपल्यासोबत आहे. त्याचे विचार आपल्यासोबत आहेत; असे सर्व चालू असताना, जानकी आक्का त्याला ओळखते व स्वतः त्याची ओळख करून देते आणि म्हणते हा आमचा मार्क्स बाबा याचा जन्म हा जर्मनीत झालेला पण कार्यात विलीन होऊन; तो इंग्लंडमध्ये मरण पावला; असे जरी असले तरी त्याने जगासाठी खूप मोठे कार्य केले व त्यावर आधारित मोठमोठे ग्रंथ त्याने लिहून ठेवले. इथे मार्क्स हा केवळ तत्त्वज्ञानी विचार पुरुष नव्हता; तो सामान्य श्रमिकांचा विचारवंत होता. त्याने आपले सारे आयुष्य श्रमिकांसाठी घालवले.

पुढे कवी सभेत बोलताना मंदी, दारिद्र्य, कामगाराची अवस्था यांचे कारण तो शोधू लागतो. त्यावर अभ्यास तो करतो. तेव्हा

मार्क्स पुढे येऊन त्यांना म्हणतो, "मी सांगतो – आणि" तो आपले विचार येथे स्पष्ट करतो आहे. अर्थात कवीला आपल्या जीवनातील प्रत्येक संघर्षात, प्रश्नात मार्क्सची विचारसरणी महत्वाची व आदर्श वाटत आहे. मग पुढे एका गेट्सभेत कवी म्हणतो, "आता इतिहासाचे नायक आपणच आहोत." म्हणजे इथे कामगारच हे समाज परिवर्तनाचे खरेखुरे नायक आहेत; तेव्हा त्या सभेत टाळया वाजवणारा, हसतपणे पुढे येणारा, आपल्या पाठीवर मायेने हात ठेवणारा, मार्क्स त्यांना दिसू लागतो! अर्थात मार्क्सचे विचार त्यांच्या आत्मियतेचा स्पर्श बनलेला लक्षात येतो, तेव्हा कवी म्हणतो

**"अरे कविता-बीविता लिहितोस की काय?**

**छान, छान..!**

**मलासुद्धा गटे आवडायचा"**

कवीने यातून मार्क्स हा केवळ अर्थशास्त्रज्ञ, राजकीय तत्वज्ञ नसून तो एक साहित्यप्रेमी अर्थात कलेचा प्रेमी माणूसही होता हे दाखवून दिले आहे.

ही कविता कामगाराच्या जीवनातील संघर्ष समजून घेण्यासाठी, मार्क्सचे विचार किती आवश्यक आहे? ते सांगते. शिवाय प्रत्येक आंदोलन, संप, सभा व भाषण यामध्येही मार्क्स कसा जिवंत आहे? तो केवळ ग्रंथकार नसून, कामगाराचा मित्र मार्गदर्शक व प्रेरणास्थान आहे! तसेच समाजक्रांतीसाठी तो कामगारांचा नायक असून, त्याची विचारसरणी संघर्षातही शक्ती देणारी अशी आहे! अर्थात नारायण सुर्वे यांनी कार्ल मार्क्सच्या विचाराला इथे स्पष्ट करून; त्याचे विचार कामगाराच्या जीवनात खांद्याला खांदा लावणारे, सोबत घेऊन चालणारे, कामगारांच्या संघर्षाला साथ देणारे असे आहेत; तेच या कवितेत कवीने स्पष्ट केले आहे! म्हणून तर

नारायण सुर्वे यांनी मार्क्सला विचाराचा, प्रेरकांचा, मित्राचा व साहित्यप्रेमीचा जिवंत रूपक म्हणून प्रस्तुत केला आहे. या कवितेतील संप, संघर्ष, ऐतिहासिक जागरूकता, मानवी सहानुभूती आणि साहित्यिक सौंदर्य, अत्यंत महत्त्वाचे आहे. याचमुळे या कवितेत सामाजिक, ऐतिहासिक व मानवी दृष्टिकोनातून अत्यंत प्रभावी व प्रेरक विचारधारा जगण्याला बळ देणारी अशी आहे. तिच या कवितेचा मूळ गाभा आहे म्हणून तर कामगाराच्या जीवनातील तिथला संप, आंदोलन, संघर्ष महत्त्वाचे आहे.

इथे कवी आपल्या पहिल्या संपात कार्ल मार्क्स अनुभवतो, तो जिवंत आहे! तो त्याच्या विचाराच्या रूपात व बॅनरवर, सभेत, भाषणात कवीच्या सोबत आहे! त्याचेच मार्गदर्शन कवीला सतत मिळते म्हणून तर मंदीचे कारण, दारिद्र्याची मूळ कारणे, श्रमिकांचे हक्क हे अभ्यासण्यासाठी, कवीला मार्क्सच्या विचारसरणीची माहिती उपयुक्त ठरते. या सोबतच कवी हे ही इथे अनुभवतो की इतिहासाचे नायक, कामगार हेच आहेत व मार्क्स त्यांना मार्गदर्शन करणारा त्यांचा मित्र आहे मग शेवटी मार्क्सचे हास्य, हाताखाली हात ठेवणे व कविता गटयाबद्दलच्या प्रेमाद्वारे त्यांची मानवी व साहित्यप्रेमी बाजूही कवितेत उलगडत जाते आहे!

या कवितेचे प्रतिमासौंदर्य अभ्यासताना ‘पहिल्या संपात’, ‘गेटसभेत भाषण ऐकत उभा’ या कामगार जीवनातील संघर्षाची दृश्य प्रतिमा असून; त्या संप व आंदोलनाच्याही प्रतिमा आहेत. ‘खांद्यावर बॅनर’, ‘टाळी वाजवणे, हसणे, हात ठेवणे’ या मार्क्सच्या प्रतिमा मार्गदर्शक, मित्र व प्रेरक म्हणून येताना दिसतात तर ‘कविता- बिविता लिहितोस का?’ ही प्रतिमा साहित्य व कला सांगणारी असून, इथे मार्क्स हा साहित्य व कलेचा प्रेमी म्हणून येते.

या कवितेतील विविध अलंकार पाहताना इथे मार्क्स हे रूपक आहे, ते मार्गदर्शक, मित्र म्हणून आलेले आहे तर तो अजून जिवंत आहे; हा उपमा अलंकार असून; तो फक्त व्यक्ती नाही तर विचाराचा आत्मा कवीने मानलेला आहे! यासोबतच मार्क्स पुढे आला, पुढे येत गेला! यातून अनुप्रास अलंकार हा क्रमिक क्रियाची पुनरुक्ती दाखवतो व माझ्या पहिल्या संपातच, मार्क्स मला असा भेटला; यातून अनुभवाची तीव्रता ही पुनरुक्तीने दिसून येते.कवितेतील वीर रस यातून कामगाराचा संघर्ष, संप व आंदोलनातील साहस पहायला मिळते तर शांत रस विचाराच्या माध्यमातून मार्गदर्शन करणारा, आत्मियतेचा अनुभव सांगतो. शृंगार रस हा मानवतेची सौम्यता, हास्य, कविता आणि गटयाबद्दल प्रेम, मी शपथ करतो तर करूण रस हा दारिद्र्य, मंदी, कामगाराचे दुःख समजून घेणारा वाटायला लागतो.

थोडक्यात ही कविता मार्क्सवादी विचारसरणीचे विचार मांडणारी व कामगार जीवनातील संघर्ष, धैर्य, प्रेम, मानवता व साहित्य प्रेम यांचा संगम आहे. त्यामुळे कार्ल मार्क्स हा त्यांच्या विचारतून कवीने कवितेत जिवंत मांडला आहे; यातून ऐतिहासिक, सामाजिक जागरूकता कवीने विशद करून इतिहास घडवणारे नायकच  कामगार आहेत म्हणून त्याच्या प्रेरणास्थानी मार्क्स विचारसरणी आहे असे कवी स्पष्ट सांगतो आहे!

***

# ८.अक्षरे चुरगाळिता

**– ना. धों. महानोर**

**परिचय:-** नामदेव धोंडो महानोर (जन्म १९४५ – मृत्यू २०२३)

पूर्वीचे औरंगाबाद आजचे संभाजीनगर या जिल्ह्यातील ‘पळसखेड’ या गावी ना. धों. मनोहर यांचा जन्म झाला.ते एक थोर निसर्ग कवी, कथाकार, कादंबरीकार व गीतकार म्हणून मराठी साहित्यात प्रसिद्ध आहेत. महानोर व निसर्ग यांचे अतूट नाते म्हणजे यांच्या कविता होत म्हणून त्यांच्या जीवनाचा निसर्ग मूलाधार आहे!

‘रानातल्या कविता’, ‘वही’, ‘पावसाळी कविता’, ‘अजिंठा’, ‘पानझड’, ‘गाथा शिवरायाची’, ‘पळसखेड ची गाणी’, ‘प्रार्थना दयाघना’, ‘पक्षांचे लक्ष थवे’, ‘दिवे लागण्याची वेळ’ इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित. ‘गांधारी’ ही कादंबरी. ‘गावाकडच्या गोष्टी’ हा कथासंग्रह तर ‘गपसप’ हा लोककथांचा संपादित संग्रह त्यांच्या नावावर आहे. ‘जैत रे जैत’, ‘सर्जा’, ‘एक होता विदूषक’, ‘मुक्ता’ व दोघी इत्यादी चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केलेले आहे.

भारत सरकारने त्यांना ‘पद्मश्री’ हा किताब देऊन त्यांचा गौरव केला आहे! कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा ‘ जनस्थान पुरस्कार’ व इतर सामाजिक प्रतिष्ठित अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत.

ग्रामीण जीवनातील कष्ट, दुःख, भोग व लोकजीवनाचे दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. निसर्गाची जिवंत व रसरशीत चित्रणे, गेयता, लयबद्धता व नादमयता इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या कवितेची सांगता येतात.

प्रस्तुत कविता ही ‘रानातल्या कविता’ या काव्यसंग्रहातून घेतलेली असून या कवितेत अंतरीची ऊर्जा ही आयुष्याच्या प्रवासाला कशी बळ देणारी असते यावर कवीने भाष्य केलेले आहे.

अक्षराच्या संगतीने कवीने आपले आयुष्य कसे प्रकाशमान केले? त्या आयुष्याची गाथा म्हणजे ही कविता होय! या कवितेत अत्यंत व्यक्तिगत अनुभव, संघर्ष व साक्षात्कार आलेला आहे म्हणून तर कवी हा एकटा पण निर्भर व कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय चालताना दिसतो आहे तेव्हा तो एककल्ली एकटा वाटतो आहे व एकटाच चालतो पण आहे! यावेळी जीवनातील अनेक अडचणी, त्रास, मानसिक थकवा किंवा संघर्ष वाट्याला येणेही स्वाभाविक आहे. यात त्याला कुठे आधार मिळाला नाही. त्यामुळे आयुष्यात दिशा किंवा स्थिरता ही त्याला लाभली नाही पण या साऱ्या अडथळयाचा सामना करत कवी मात्र पुढे जात आहे.

शारीरिक व मानसिक हे सारे श्रम करताना, आपल्या शरीराला बळ मागून, नवनवे संकल्प व प्रयत्न सुरू ठेवले यात दुःख न मानता आपल्या प्रयत्नांनी या जीवनाला पुढे नेले. यावेळी मात्र सुरुवातीला दिसणारे ध्येय हे अस्पष्ट होते. त्यामुळे ते अनिश्चित वाटले पण मनात प्रचंड जागवणारा आवेग होता म्हणून तर कवी म्हणतो –

**“मात्र पायीच्या बळाला - जागता आवेग होता.**
**नाक्षिती होती कशाची – मी मला उधळीत गेलो”**

मग या सर्व अनुभवातून आत्मज्ञान घेत-घेत धुळींची, लक्तराची लाज गुंडाळून, मी पुढे-पुढे जात होतो तेव्हा त्या संघर्षातून जीवनातील अनेक वेदना व त्यांचा अर्थ कवीला कळू लागला. यावेळी कुणाचे दिव्य आशीर्वाद किंवा अनपेक्षित मार्गदर्शन वा प्रेरणा त्यांना मिळाली नाही मग त्या दुःखावर मात करून ते दुःखच जणू फूल बनले. जेव्हा ही अक्षरे शब्दांमध्ये, लेखनात किंवा कवितेतून जीवनाच्या अनुभवातून, आंतरिक प्रेरणेतून मांडून शब्द व साहित्याचे महत्त्व विशद केले तेव्हा हे आंतरिक विचार व ज्ञान

शोधणे महत्वाचे वाटले मग ज्ञान, प्रेरणा किंवा अनुभवाचे आध्यात्मिक वा मानसिक पोषण नकळत घडून गेले म्हणून तर कवीला हे सारे 'मी अमृताचे कुंभ प्यालो' असे वाटायला लागते.

याच वेळी उद्याच्या जीवनाची तयारी कवीला करावी वाटते व मग तो जीवनातील अनुभवाचा यथोचित वापर करून भविष्यातील संघर्ष, दुःख व विविध उद्दिष्टे यासाठी तयार होतो. जीवनात जेव्हा आपण एकटे पडतो तेव्हा अनेक अडचणी, थकवा व अनिश्चितता यांच्यासोबत आपणास संघर्ष किंवा सामना करावा लागतो पण यातून मार्ग जर आपणास काढायचा असेल तर आपले प्रयत्न व धैर्यच कामाला येते हे सारे करताना आत्मज्ञान, प्रेरणा, दिव्य आशीर्वाद व अनुभव हे मिळत राहतात तेच अनुभव हे उद्याच्या जीवनासाठी ऊर्जा व दिशा देणारे ठरतात.

या कवितेत मार्ग व संघर्ष, शारीरिक प्रयत्न, शब्द व साहित्य इ. प्रतिमासौंदर्याचा वापर करून कवीने जीवनातील अडथळे, धैर्य, जिद्द व प्रयत्न सांगून यातील अनुभव व ज्ञानाचे आध्यात्मिक व मानसिक पोषणही सांगितलेले आहे. यासोबत वापरलेले रूपक, उपमा, अनुप्रास, पुनरुक्ती यातून अनुभव, दाटलेली वेदना, भावनेची ताकद ही वाढताना दिसते. पुनरुक्ती या शब्दांमुळे कवितेला गेयता व लयबद्धता प्राप्त होते.

विविध रस या कवितेत आल्यामुळे यातील वीर रस हा जीवनातील संघर्ष, धैर्य व प्रयत्न सांगणारा असून शांत रस हा एकांत, ध्यान, अनुभवातून आत्मसाक्षात्कार सांगतो तर करुण रस हा दुःख, थकवा व मानसिक क्लेश विशद करतो व श्रृंगार रस हा शब्दाच्या माध्यमातून मिळालेली प्रेरणा व अनुभवाचे सौंदर्य विशद करतो.

थोडक्यात ही कविता एकटेपणाच्या अडचणीतून सामना करणारी संकल्प, प्रयत्न व जिद्द यांना दिशा देणारी, आत्मज्ञान, प्रेरणा, अनुभव व दिव्य आशीर्वाद मिळवणारी असून उद्याच्या जीवनासाठी दिशा, ऊर्जा व प्रगती सांगणारी आहे तेव्हा एकटेपणाला न घाबरता व्यक्तीने जीवनातील संघर्षाला सामोरे जावे. वाटेत अनेक अडचणी (क्षिती) येतील पण त्याला न घाबरता सामना करता येतो व जीवनाचे ध्येय गाठता येते. त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते असे कवी सांगतो आहे.

***

# ९. निरालय

**- खलील मोमीन**

**परिचय:** - खलील गुलाम भाई मोमीन (जन्म १९४५)

भारतीय खाद्य निगम मध्ये नोकरी करून २००५ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. त्यांनी कवितेसोबतच, गझल लेखनही केलेले दिसून येते. 'निरालय' व 'अक्षराई' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. 'बिंब - प्रतिबिंब', 'कुंकवाचे कुंपण' हे त्यांचे गझलसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांची कविता समग्र आयुष्याला सामोरे जाणारी असून तिच्यात जीवनामधील ओसाडपणा, रखरखाट व वठलेपण इत्यादी बाबी सांगता येतात.

'अक्षराई' या त्यांच्या काव्यसंग्रहास 'महाराष्ट्र शासनाचा - उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार' प्राप्त झालेला आहे. त्यासोबतच एस.एल. किर्लोस्कर पुरस्कार, गिरणा गौरव पुरस्कार, न्यूज १८ लोकमत पुरस्कार, पद्मश्री विखे पाटील पुरस्कार व कवयित्री संजीवनी खोजे पुरस्कार इत्यादी प्राप्त झालेले आहेत.

दूरदर्शन, आकाशवाणीवरून त्यांच्या कवितांचे सादरीकरण झालेले असून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्यांनी सहभाग नोंदवलेला आहे. इ.स.२००३ साली नाशिकमध्ये पार पडलेल्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलेले आहे.

प्रस्तुत कविता ही 'निरालय' या काव्यसंग्रहातील असून, यात जीवनातील प्रतिकूलता ही मानवी आयुष्याला कधीच संपू शकत नाही असा आशय ती दाखवते म्हणून माणसाने आपले जीवन आपल्या व्यवहारात ठेवून नेहमी सकारात्मक भाव बाळगून येणाऱ्या प्रतिकूलतेसोबत उभे राहिले पाहिजे हीच सूचना ही कविता करते व

मानवी जीवनातील दुःख, वेदनाचे निराकरणही करते. तेव्हा आपले हे सकारात्मक विचार विविध संदर्भानी सर्वत्र पोहोचले पाहिजेत असा आशावादही व्यक्त करते. इथे निरालय म्हणजे आश्रय विरहित, एकाकी, कुठेच विसावा न घेणारे जीवन होय! म्हणून तर कवी म्हणतो की, 'धर्मग्रंथाची पाने शांत, निद्रिस्त पडलेली आहेत!' अर्थात इथे धर्म, तत्त्वज्ञान, उपदेश यांच्या पानावर खूप काही लिहिलेले असले तरी ते माणसाच्या दैनंदिन दु:खाला स्पर्श करत नाही ते सनातन दुःख अपरिहार्यच असते म्हणून तर कवी पुढे म्हणतो की......

**"वनवे पेटणे नवे नाही**
**असे किनाऱ्याला, आडोशाला राहून**
**सांगतो सागर आवेशाने गरजू**
**काळोख्या रात्री एखादा तारा**
**उनमळून कोसळला."**

म्हणजे संकटे, आगी व विध्वंस हे सारे काही मानवी जीवनाचा एक भाग आता झालेले आहे तेव्हा हा निसर्ग स्वतःच्या भाषेत आपली शक्ती, रौद्रता प्रगट करतो. 'काळोखात तारा कोसळला' तरी पहाटेचे हसू कधीच थांबत नाही. अर्थात निसर्गाच्या चक्राला, वेळेला व नियतीला कोणीच थांबू शकत नाही! जीवन हे कितीही सुखद - दुःखद असू द्या! आयुष्यात प्रसंग हे येतात पण त्यातूनही नवा दिवस उगवत असतो. त्यासाठी आपल्याला संयम ठेवावा लागतो.

पाखरे उडून जातात पण झाड हे घट्ट मूळ रोवलेले असते. ते कशानेही हलत नाही. त्याला कोणी हलवू शकत नाही तसेच जीव हा मायेत, बंधनात अडकलेला असून त्यामुळे त्याला हळुवार सामना

करावा लागतो. स्वातंत्र्याची आकांक्षा मनात असूनही येणारी परिस्थिती ही नशीब व विविध बंधनाने माणसाला पुढे जाऊ देत नाही तेव्हा कवी म्हणतो की, “इथे सर्वांनाच हे माहीत आहे की आयुष्य हे वेदनेपुरते तरी निरालय असते म्हणून या आयुष्याला मोठ्या धैर्याने, निश्चयाने सामोरे जावे लागते.” प्रत्येकाला अनेक प्रकारची दुःख असतात पण त्यावर मात करत मार्ग काढत आपण पुढे जायचे असते! त्या दुःखातून कोणाची ही सुटका होत नाही म्हणून तर माणूस हा शेवटी एकटाच सापडतो व दुःख कवटाळत बसतो!

अर्थात या कवितेतून जीवनातील वेदना किती अपरिहार्य आहे? धर्मग्रंथ, तत्वज्ञान हे दुःखाचे थेट उत्तर देऊ शकत नाहीत. निसर्गाचे चक्र हे दुःखानंतरही कधीच थांबत नाही पण यातून येणारा नवा दिवस हा उगवतच असतो तेव्हा मानवी जीवनाची जी बंधने आहेत ती झाडासारखी त्याच्या मुळात घट्ट रोवलेली आहेत! म्हणून तर माणूस शेवटी एकाकी पडतो!! त्यालाच कवी ‘निरालय’ म्हणतो आहे! अर्थात ही कविता अस्तित्ववादी विचारांना स्पर्श करणारी असून यातून एकाकीपणा, नियतीचा अटळपणा पहावयास मिळतो. हे मानवी जीवन दुःख, बंधने, एकाकीपणा व नियती यातच सामावलेले आहे. वरवर आपल्या संस्कृतीत धर्मग्रंथाचा खूप मोठा आधार आहे परंतु तो जीवनातील दुःखाला स्पर्श करू शकत नाही! निसर्ग हा सतत आपली चक्रे चालवतो तेव्हा तारे कोसळले! तरी पहाट उगवतच असते पाखरे उडून जातात पण झाडाची मुळे घट्ट रोवल्यामुळे ते हलू शकत नाही तसेच आहे माणसाचे कारण आपल्या जीवनातील या वेदनापासून त्याला बाजूला जाताच येत नाही आयुष्य या वेदनेपुरते निरालय ठरते म्हणून तर ही कविता आधुनिक भावकविता ही वाटते यात तत्वचिंतन, अस्तित्ववादी वेदना व जीवनदृष्टी पहावयास मिळते. कवीच्या मनातील शांत, करुणा व विशद भावना ही इथे आयुष्य एकाकी करणारी आहे. यातील वेदना

ही पक्की आहे परंतु तिला ठोस सामोरे जाणे गरजेचे आहे अशी कवीची भावना ही भावरसाने युक्त आहे.

या कवितेतील करूण रस व शांत रस हा मानवी जीवनातील दुःख, वेदना व असहायता सांगतो. अखेरीस एक गहन विचार मानवाला कवी करायला लावतो तो म्हणजे आयुष्य हे वेदनेपुरते तरी 'निरालय' असे आहे! त्याची जाणीव होणे म्हणजे एक तत्त्वचिंतन आहे! जी आपणास शांतता प्रदान करते. या कवितेतील रूपक अलंकारात झाडाची मुळे रोवलेली दिसतात, ती हलू शकत नाहीत! त्याचप्रमाणे मानवी जीवनाच्या बंधनाचे प्रतीक म्हणून ती दुःख माणसाच्या वाट्याला येतात तर उत्प्रेक्षा अलंकारात पहाटेचे हसू थांबू शकत नाही; तारा कोसळल्याने यातून दिवस, प्रकृतीला माणूस मानवी स्वरूप देताना दिसतो! कवितेतील प्रतिमा व प्रतीक ही जीवनातील दुःखाचे असणारे तत्त्वज्ञान हे धर्मग्रंथात सापडत नाही म्हणून त्यावर मात करता येत नाही.

थोडक्यात ही कविता आधुनिक भावविश्व व्यक्त करणारी असून यातील प्रतिमा व प्रतीकांच्या सह्याने मानवी जीवनातील एकाकीपणा हा दुःखाचा स्वीकार व निसर्गशी तुलना करणारा असा आहे. शब्दरचना अत्यंत सोपी असून काव्यविचार मात्र गंभीर असा आहे! 'निरालय' ही कविता जीवनातील दुःख, एकाकीपणा व तत्त्वचिंतन मांडणारी असून करूणरस प्रधान आहे. शांतरस हा इथे उपरस म्हणून येतो. निसर्ग प्रतिमा, रूपक व अलंकार यांच्या सह्याने ही कविता जीवनातील वेदनेचा गहन स्वीकार करून पुढे जायला सांगते आहे.

# १०. बेभरवशाचे जगणे

**– जगदीश कदम**

**परिचय:-** संपूर्ण नाव - जगदीश माधवराव कदम (जन्म १९५३)

मराठीतील प्रसिद्ध कवी, कादंबरीकार, नाटककार, समीक्षक व लेखक म्हणून ख्याती. शेतकरी जीवन, त्यांचे सुख - दुःख हे त्यांच्या लेखणीचे महत्त्वाचे विषय आहेत. 'रास आणि गोंडर', 'झाडमाती', 'नामदेव शेतकरी', 'गाव हाकेच्या अंतरावर' व 'ऐसी कळवळ्याची जाती' हे काव्यसंग्रह प्रकाशित. 'मुडदे', 'आखर', 'मुक्कामाला कुठले पाय' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध. 'ओले मूळ भेदी' ही कादंबरी, 'बुडत्याचे पाय खोलात', 'वडगाव लाईव्ह' ही नाटके तर 'सहयात्री', 'खपलेली घर' हे ललित लेखन, 'साहित्य : आकलन व आस्वाद' या समीक्षा ग्रंथाचे लेखन. 'महात्मा फुले' व 'महात्मा गौतम बुद्ध' हे चरित्रपर ग्रंथ आणि 'गांधी समजून घेताना' हा वैचारिक ग्रंथ प्रकाशित आहे.

महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसह, अनेक प्रतिष्ठित संस्थाचे पुरस्कार त्यांना मिळालेले असून गंगापूर येथे भरलेल्या ४३व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले आहे. त्यांच्या साहित्याचा कन्नड व हिंदी भाषेत अनुवाद झाला असून ग्रामीण जीवन वास्तव, कृषी संस्कृतीचे दाहक भावविश्व, बदलते ग्रामजीवन, शोषित कष्टकरी स्त्रियांचे चित्रण इत्यादी अनेक विषय त्यांच्या काव्यलेखनाचे पहावयास मिळतात.

'बेभरवशाचे जगणे' ही कविता 'गाव हाकेच्या अंतरावर' या काव्यसंग्रहातील असून यात कृषीप्रधान, देशातील शेतकरी जीवनाची पडझड व त्यामागील कारण मीमांसा कवीने

वास्तवरुपात मांडलेली आहे. यासोबतच शेतकऱ्याच्या श्रमाचा, दुःखभोगाचा विचार या व्यवस्थेने करणे किती गरजेचे आहे? अशी अपेक्षा कवीला वाटत आहे म्हणून तर तो म्हणतो –

**"बेभरवशाचे जगणे - ज्याच्या माथी,तो शेतकरी!**
**गोचिडासारखा चिटकून बसतो मातीला - तो शेतकरी!"**

इथे शेतकरी कोणाला म्हणायचे? ते कवीने अगदी सहज सांगितलेले आहे. शेतकऱ्याचे दुःख, त्याचे कठीण जीवन, त्याची मातीवरील निष्ठा व समाजातील उपेक्षा सहन करूनही या शेतकऱ्याचे जगणे हे बेभरवशाचे आहे म्हणजे ते खात्रीशीर तर नाहीच पण सुरक्षितही नाही! तरी हा शेतकरी मातीला कसा गोचीड चिटकून राहतो? अगदी तसाच तो मातीला चिकटून राहताना दिसतो आहे. गोचीड व शेतकरी यातील फरक पुढे कवीने सांगितलेला आहे तो म्हणजे 'गोचीड' हा लालची असतो. तो रक्तासाठी चिटकून बसतो पण हा शेतकरी आपला घामगाळून मातीवर प्रचंड प्रेम करतो. त्याला कधीच स्वार्थासाठी चिकटून राहणे जमले नाही.

शेतकरी हा कित्येक पिढ्यानपिढ्या कष्ट करून, घाम गाळून शेती करत असतो पण कधी अतिवृष्टी तर कधी अनावृष्टीमुळे तो हैराण होतो. आपल्या कष्टाची तमा करत नाही. आपल्या मातीवरील निष्ठा तो सोडत नाही; तरीही हा समाज सत्तेच्या सिद्धांतिक पातळीवर शेतकऱ्याचे जीवन जसे आहे तसेच कबूल करतो. त्याच्या समस्याकडे कुणाचे नीट लक्ष नाही. त्यामुळे त्याचे घर, संसार, जीवन हे निसर्गाच्या लहरीमुळे कधी - कधी उध्वस्त होते! त्याची ही लढाई एकतर्फी असते कारण त्याच्या हाती शस्त्र नसते व शास्त्रही नसते. तो नि:शस्त्र असल्यामुळे असहाय होतो. या पराभुताच्या प्रदेशातच त्याचा इतिहास लिहिला जातो! शेतकरी नेहमीच यात

हरलेला असतो; तरी देखील त्याचे योगदान, अस्तित्व खूप मोठे आहे! भविष्यात या मातीला हे मान्य करावे लागेल.

या मातीला जीवापेक्षाही जास्त जीव लावणारा शेतकरी हा देखील याच मातीतला आहे म्हणून ही कविता शेतकऱ्यांच्या जीवनाची सत्यकथा वाटते! यात कष्ट, उपेक्षा, पराभव, मातीवरील निष्ठा व मातीशी अखंड नाते पाहायला मिळते. बेभरोशाच्या असुरक्षित व उपेक्षित जीवनाची ही कहाणी असल्याने, शेतकऱ्याच्या जीवनातील सत्य बाबींना उजाळा देते! खरे तर हा शेतकरी मोठा कष्टाळू आहे म्हणून तर त्याचा या मातीशी स्वतःच्या प्राणापेक्षाही जास्त जवळचा संबंध आहे पण ही समाजव्यवस्था त्याला मानत मानत नाही हीच कवीची खंत आहे! त्यामुळे इथे शेतकऱ्याची अस्थिरता, बेभरोसा, अपेक्षा व त्याग यांचे चित्रण पाहावयास मिळते. त्याच्या हाती शस्त्र नसल्याने, तो पराभवाच्या छायेत, आपले जीवन घालवतो व आपल्या मातीशी, मातृभूमीशी कधीच गद्दारी करत नाही. त्याची प्रचंड मातीवरील निष्ठा ही अखंडपणे दिसून येते.

आधुनिक सामाजिक, वास्तववादी कविता म्हणून या कवितेकडे आपणास पाहता येते. यातून शेतकरी वर्गाचे प्रश्न, त्याची अवस्था व त्याच्या जीवनाची सत्यकथा उलगडत जाते. कवीच्या मनातील, अंत:करणातील करूणाही शेतकऱ्याप्रती इथे दिसून येते. तसेच शेतकऱ्याच्या असहाय्य अवस्थेमुळे त्याच्या मनातील वेदना, विशाद व संताप ही पाहायला मिळतो पण त्याच्याकडे कुणी लक्ष देत नाही.

कवितेत येणारा करूण रस हा शेतकऱ्याचे दुःख, कष्ट व उपेक्षा दाखवतो तर शांतरस शेतकऱ्याची सत्यकथा व्यक्त करतो! तसेच

वीररसाची छटा कवितेत येत असल्याने इथे शेतकरी नि:शस्त्र असूनही जगण्यासाठी झुंज देतो आहे! अलंकारातील रूपक अलंकार हा शेतकरी गोचिडासारखा मातीला चिकटलेला पण लालची नसणारा आहे तर उत्प्रेक्षा अलंकारातून निथळता घाम मातीला नाऊ घालतो आहे; यातून मातीशी जीवापेक्षाही जास्त जीव लावणारे नाते, हे मानवीकरणाचे प्रतीक म्हणून येते.

यासोबतच इतर प्रतिमा व प्रतीके देखील कवितेत आढळून येतात. उदा. गोचीड हा लालसेचे प्रतीक, माती हे आई उपजीविका व जीवनाचे प्रतीक. घाम हा कष्ट, त्याग व प्रामाणिकपणाचे प्रतीक तर मांडव ही प्रतिमा शेतकऱ्याचा संसार वारंवार उध्वस्त करणारी म्हणून पहायला मिळते व या जीवनाला ती लागू होते परंतु शेतकऱ्याच्या हाती शस्त्र, शास्त्र नाही यातून शेतकऱ्याची अगतिकता लक्षात येते! या सर्व काव्यातील सौंदर्यामुळे ही कविता वर - वर जरी साधी, सोपी वाटत असली तरी अत्यंत हृदयस्पर्शी अशी आहे. यातील रूपक व प्रतिकांच्या साह्याने ती शेतकऱ्याची खरी कहाणी आहे! तसेच सामाजिक अन्यायाविरुद्ध कवीचा जिव्हाळा व तळमळ व्यक्त करणारी ही कविता असून तिचा मूळ गाभा शेतकरी आहे!

थोडक्यात सांगायचे तर 'बेभरवशाचे जगणे' ही कविता शेतकऱ्याच्या उपेक्षित, बेभरवशाच्या जगण्याचे वास्तववादी कथन असून यातील करुणरस हा प्रधान असून त्याला वीर व शांतरसाची जोड मिळाल्याने ती अधिकच वास्तव झाली आहे. या सोबतच विविध रूपक, प्रतीक व प्रतिमाच्या माध्यमातून कवीने या कवितेत शेतकऱ्याचे दुःख व त्याची आपल्या मातीवरील निष्ठा अभिव्यक्त केलेली आहे.

***

# ११. गोधड

**- वाहरू सोनवणे**

**परिचय: -** वाहरू फुलसिंग सोनवणे (जन्म १९५०)

आदिवासी साहित्य व सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व करणारे, विद्रोही, सांस्कृतिक चळवळीला गतिमान करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान कवी सोनवणे यांचे पहावयास मिळते. आदिवासी समाजाच्या चळवळीची उभारणी व त्यांच्या न्याय हक्कासाठी, संघर्ष करणारे मराठीतील महत्त्वपूर्ण कवी म्हणून त्यांचे नाव घ्यावे लागते.

'गोधड' व 'रोजली' हे काव्यसंग्रह प्रकाशित. 'गोंधड' हा मराठी व बिल्लोरी भाषेतला कवितासंग्रह त्यांचा असून, त्यांची कविता आदिम जीवनानुभवाचे वास्तवदर्शी रूप प्रगट करते. कवी सोनवणे यांची कविता आदिवासी, शोषित, सर्वहारा समाजाला प्रेरणा देणारी आहे. तसेच इ.स.१९९० साली पार पडलेल्या पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाचे व इ.स.२००० साली कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या दुसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले आहे. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संघर्षमय, समर्पित जीवनासाठी महाराष्ट्र फाउंडेशनच्या समाजकार्य पुरस्काराने ते सन्मानित आहेत.

अन्याय, अत्याचाराच्या विरोधात बंड करणारा, ठाम भूमिका घेणारा हा कवी असून त्यांचे प्रबोधन, क्रांतिकारी विचार, विद्रोह हे त्यांच्या काव्याचे विशेष सांगता येतात.

प्रस्तुत कविता गोधड ही त्यांच्या 'गोंधड' या काव्यसंग्रहातील असून यात आदिवासी, उपेक्षित समाजातील व्यथा, वेदनांचे चित्रण आलेले आहे. या कवितेतील गोधड हे दुःख, दारिद्र्याचे प्रतीक असून

ते शोषण व्यवस्था, बदलून टाकणाऱ्याचे विचार आहेत ही कविता साध्या - सोप्या भाषेत असून या कवितेतील जीवनानुभव हा अत्यंत हृदयस्पर्शी, भावस्पर्शी असा आहे म्हणून तर कवी म्हणतो –

**"माझी फाटकी गोधड मळलेली**
**गोधडीतल्या गोधडीत गुदमरत राहिलो**
**आंबट वासाने नाक खालीवर करून**
**कुशी बदलत राहिलो, गोधडीत नाक खूपसून,**
**आंबट वास सोसत राहिलो."**

या ओळीतील दुःख, दाह हा हृदयास पीळ पाडणारा असा आहे. कवी स्वतःच्या फाटक्या व मळलेल्या गोधडीतून शेतकरी जीवनाचे वास्तव ही इथे चित्रीत करत आहे. अर्थात ही गोधडी म्हणजेच गरिबी होय. गरिबीचे दुःख, दारिद्र्य व परंपरेने चालत आलेली ही एक वास्तव वस्तूच म्हणता येते, याच गोधडीत कवीचे बालपण व सारे जीवन गेलेले दिसते. ते कधी गुदमरून जाणारे वाटते तर कधी तिच्या आंबट वासाने, नाक दाबून जीवन जगणारे असे दिसते. ती गोधड कवीला बदलता आली नाही. एवढे दारिद्र्य, उपेक्षा त्यांच्या जीवनात त्यांना त्या काळी सहन करावी लागली. कित्येक पिढ्यानपिढ्यांची ही गोधडी साक्षीदार आहे! असेही कवी आवर्जून इथे सांगत आहे.

याच गोधडीत शेतकऱ्याचे सारे आयुष्य गेलेले आहे. त्याच्या कष्टाचे अश्रू याच गोधडीवर सांडलेले आहेत म्हणून ही गोधड फक्त कापडाची वस्तू नाही तर आपल्या पूर्वजांचे दुःख व आजच्या वारसदारांच्या वास्तवाचे प्रतीक असून ही गोधड सतत आठवण करून देणारी वस्तू आहे; असे कवी सांगत आहे! यातून शेतकरी वर्गाचे दुःख, गरिबीची उपेक्षा दिसून येते. आज काळ बदलला, माणसं बदलली पण शेतकऱ्याची स्थिती काही फारशी बदललेली

नाही. अर्थात इथे गोधड ही शेतकऱ्याच्या शोकात्मक जीवनाची पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या दुःखाचे प्रतिक आहे! आजचा शेतकरी व त्याचे पूर्वज याच गोधडीतून लहानाचे मोठे झालेले आहेत. त्यामुळे ही कविता दुःख व वारसागत दारिद्र्याचे ही प्रतिनिधित्व करते.

आधुनिक मराठी कवितेतील ही वास्तववादी, सामाजिक कविता असून ती विविध प्रतीकात्मक पद्धतीने समाजातील विषमता व अपेक्षा सांगून जाते. शेतकऱ्यांच्या जीवनातील करुणा व दुःख हा या कवितेचा मूळ विषय आहे. खरे तर या कवितेत शेतकऱ्यांच्या जीवनातील असहाय्यता, अगतिकता, गरिबी व परंपरागत दुःख पहावयास मिळते.

या कवितेत करूणरस म्हणून फाटक गोधड, अश्रूंनी भिजलेले वस्त्र, आंबट वास हे शब्द दुःखाचे गहिरे चित्रण व्यक्त करते तर शांतरस हा वास्तवाचा स्वीकार करून शेतकरी जीवन अभिव्यक्त करते. यासोबत रुपक अलंकारात 'गोधड' हे गरिबी व दुःखाचे प्रतीक म्हणून येते तर उत्प्रेक्षा अलंकारात आंबट वासाने आयुष्य गुदमरताना दिसते! अनुप्रास अलंकारात 'गोधडीच्या गोधडीत गुदमरत राहिलो' या ओळीने कवितेचे ध्वनीसौंदर्य फुलत जाते. विशिष्ट प्रतिमा व प्रतिकांचा वापर केल्याने ही कविता शेतकऱ्याच दुःख व दारिद्र्य, गरीबीचे वास्तव असाह्य चित्रण व्यक्त करते. उदा. गोधड, आंबटवास, अश्रूंनी भिजलेली गोधड इत्यादी.

तसे तर ही कविता अल्पाक्षर रमणीयत्व प्रदान असून यातील संक्षिप्त आशय, प्रतीकप्रधानता ही अत्यंत भावस्पर्शी आहे. कवितेतील 'गोधड' ही मूळ प्रतिमा वेदनादायी चित्र निर्माण करणारी आहे. अतिशय साध्या - सोप्या भाषेत पण गंभीर वास्तव मांडणारी ही

कविता आहे. यात शेतकरी जीवनाचे भाष्य असून यातील ‘गोधड’ ही प्रतिमा पिढ्यानपिढ्या गरिबी, दुःख व उपेक्षा यांची साक्ष देते. यातील करूणरस हा प्रधान असून शांतरस हा उपरस म्हणून येतो. थोडक्यात गोधडीच्या प्रतीकातून शेतकरी जीवनाचे सत्य ही कविता मांडताना दिसते.

***

# १२. एक समूह

**- उत्तम कांबळे**

**परिचय:-** संपूर्ण नाव- उत्तम मारुती कांबळे (जन्म १९५६)

एक चिंतनशील कवी, लेखक, वक्ते, पत्रकार व चळवळीतील कार्यकर्ता म्हणून उत्तम कांबळे यांची ओळख आहे. वृत्तपत्र विक्रेता ते संपादक असा त्यांच्या आयुष्याचा प्रवास आहे. दलित, आदिवासी, भटके, देवदासी, मजूर व शोषित माणसांच्या जीवनविश्वाचे चित्रण त्यांच्या लेखणीचा विषय आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक गोष्टी समाजात दिसून येऊ लागल्या. त्यातील जागतिकीकरण व भांडवली संस्कृतीने उध्वस्त केलेल्या सामान्य माणसाचे भाव- विश्व त्यांच्या कवितेत पाहायला मिळते.

'जागतिकीकरणात माझी कविता', 'नाशिक तू एक सुंदर कविता', 'पाचव्या बोटावर सत्य' इत्यादी काव्यसंग्रह. 'गजाआडच्या कविता' हे कैद्याच्या कविताचे संपादन. 'श्राद्ध', 'अस्वस्थ नायक' या कादंबऱ्या.' रंग माणसाचे', 'कावळे आणि माणसं', 'कथा माणसांच्या' इत्यादी कथासंग्रह तर 'वाट तुडवताना' हे त्यांचे आत्मकथन प्रकाशित आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कारासह, इतर प्रतिष्ठित संस्थांचे अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या लेखनाचा समावेश विद्यापीठ अभ्यासक्रमात झालेला आहे. ठाणे येथे संपन्न झालेल्या ८४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

'एक समूह' ही कविता त्यांच्या 'जागतिकीकरणात माझी कविता' या काव्यसंग्रहातील असून यात स्वार्थी, संवेदना शून्य व

शोषण प्रवृत्तीच्या अवस्थेचे, सामान्य माणसाचे जीवनविश्व आलेले आहे. ते अत्यंत अस्वस्थ करणारे असे आहे! या सामाजिक पर्यावरणात समता निर्माण करण्याचा आशावाद या कवितेतून कवीने प्रगट केलेला आहे. ही कविता मानवी समाजाच्या घनिष्ठ अनुबंधाचाही विचार करते; तेव्हा कवी सहज म्हणून जातो –

**"एक समूह असाच चालतो आहे.**
**परस्परांच्या जखमा मोजतो आहे.**
**परस्परांचे हुंदके ऐकतो आहे!**
**चालायचं तर खूप आहे.**
**पण कसं ते कळत नाही?"**

इथे संघर्ष करणाऱ्या माणसाच्या समूहाचे चित्रण कवी करताना दिसतो आहे. तो एक समूह असाच चालत आहे पण चालताना तो एकमेकांच्या जखमा, हुंदके मोजतो आहे म्हणजे यातून सुखदुःख एकमेकांचे वाटून घेतले जात आहे! रस्त्यावरच्या पाट्या, संकेत चित्रे यांचा अर्थ त्यांना कळत नाही परंतु जीवनाचा मार्ग गुंतागुंतीचा, अवघड, गोंधळात टाकणारा वाटतो आहे म्हणून तर कवी आपली कवितेतून बोट (मार्गदर्शक साधन) देताना दिसते आहे. जे लोक पायाला लागलेल्या मातीचा गर्व बाळगतात व आपल्या काळजातच वैश्विक खेड निर्माण करतात त्यांच्यासाठी कवीची कविता खांदा द्यायला, आधार द्यायला तयार आहे! जसे –

**"माझ्या कवितेने स्वतःच बोट दिलं आहे.**
**पायाला लागलेल्या मातीचा**
**गर्व बाळगणाऱ्या सर्वांना आणि**
**स्वतःच्या काळजातच वैश्विक खेडं, निर्माण करणाऱ्यांना**
**माझ्या कवितेने आपला खांदा देऊ केला आहे!"**

अर्थात कवीला इथे समता निर्माण करावयाची आहे, जे लोक थकून भागतील तेव्हा कवीची कविता त्यांच्या डोक्याला विसाव्याचे स्थान देणारी आहे. त्यामुळे हा जो समूह आहे, तो विश्वासाने पुढे - पुढे जाऊ शकतो. या प्रवासात जात, धर्म, वर्ग व यंत्राच्या (औद्योगिक/भौतिक) वेगाचे बंधन मोडून, मानवी मूल्यांकडे वाटचाल निर्माण होऊ शकते. ज्याप्रमाणे सूर्य हा त्याच्या दिशेने नेहमी सरकतो. त्याचप्रमाणे संघर्षाला, त्यांच्या प्रवासाला निसर्गही साथ देतो व यातून भविष्य हे उजळ बनते. या कवितेत मानवी ऐक्य, संघर्ष व आशा व्यक्त होते पण यातून एक सामर्थ्य निर्माण करून यातील विश्वास हा समजाला दिशा देणारा आहे.

या कवितेत समाजातील शोषित, वंचित, दुःखी माणसाच्या समूहाचे संघर्षमय जीवन पहावयास मिळते व इतरांना आधार, मार्गदर्शन व आश्वासकताही दिसून येते. ही कविता आधुनिक, सामाजिक, वास्तववादी प्रेरणादायी कविता असून यातील सौंदर्यनिर्मिती ही मानवी संघर्षाला आधार देणारी आहे. या कवितेतील भावरस हा सहानुभूती, करुणा व प्रेरणा देणारा आहे म्हणून तर इथे संघर्ष करणाऱ्या, समूहाला ही कविता आश्वासक हात देऊन, पुढे जाण्यासाठी प्रेरणाच देते आहे. संघर्ष हा समूहाच्या प्रवाहात पुढे चालण्याची प्रेरणा देणारा जो आहे तो वीर रस म्हणून कवितेत आलेले आहे. करूणरस हा परस्परांच्या जखमा, हुंदके यामधील वेदना सांगतो आहे व शांतरस हा कवितेच्या शेवटी आधार देऊन, जीवन स्वीकारण्याची शांतता निर्माण करत आहे. विविध आलेले कवितेतील अलंकार म्हणजे बोट, खांदा, आधार व मार्गदर्शक म्हणून रूपक ही अलंकारात पाहावयास मिळतात तर परस्परांच्या जखमा मोजतो, परस्पराचे हुंदके ऐकतो, यातील ध्वनीसौंदर्यात

अनुप्रास अलंकार दिसून येतो. सूर्य त्याच्या दिशेने सरकतो यातून निसर्गातील मानवीकरण गुण दिसून येतो आहे. तिथे मानवीकरण अलंकार येतो. या काव्यातील सौंदर्य हे सौंदर्य नसून एक आधार, विसावा व पेरणा म्हणून येते. यासोबतच सामुहिक अनुभव व संघर्ष हा कवितेच्या विश्वाशी जोडल्या गेल्याने वाचकांशी ही कविता संवाद साधते.

शेवटी ही कविता दुःख व संघर्ष वाटून घेणाऱ्या माणसाच्या सामूहिक प्रवासाला दिलेला आधार व प्रेरणा आहे. यातील वीर, करूण व शांतरसाने ही कविता रोचक ठरते तर प्रतीक व रूपकाच्या सह्याने ही कविता सामाजिक वाटायला लागते.

***

# १३. शिल्पकार ऐसा

**- प्रकाश मोगले**

**परिचय:-** संपूर्ण नाव - प्रकाश नारायण मोगले (जन्म १९६२)

प्रकाश मोगले यांचा जन्म हिंगोली जिल्ह्यातील 'सिरला' या गावी झाला. बुद्ध, फुले, शाहू व आंबेडकर यांच्या विचाराने ते प्रभावित झालेले, आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते व कवी म्हणून ते परिचित आहेत. सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, धर्मांधता नष्ट करण्यासाठी लेखन करणारे, पुरोगामी विचाराचे कवी म्हणून त्यांची महाराष्ट्रात ख्याती आहे. परिवर्तनवादी मूल्यविचारांना प्रमाण मानून विज्ञानवाद, प्रयत्नवाद रुजविणारे त्यांचे लेखन आहे.

'दंभस्फोट', 'युद्ध अटळ आहे' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित. 'कावस', 'धर्मद्रोही', 'धर्मद्रोही आणि धम्म धर', 'दिशा' इत्यादी कथासंग्रहाचे त्यांनी लेखन केले आहे. 'समाजप्रेही उच्चभ्रूची दलित आत्मकथने', ' समकालीन आंबेडकरवादी साहित्य प्रवृत्ती व प्रदुषणे', 'आम्हा घरी धन', 'सोयरे सांगाती' हे त्यांचे समीक्षाग्रंथ प्रकाशित आहेत. 'निर्दालन कंटाकाचे', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलितेतर सहकारी' हे त्यांचे वैचारिक ग्रंथ प्रकाशित आहेत. यासोबतच त्यांनी विविध वाङ्मयीन प्रकारातूनही लेखन केलेले आहे.

गो. नी. दांडेकर कथालेखन पुरस्कार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील बाबूराव बागुल कथालेखन पुरस्कार, शब्दरंजन काव्य पुरस्कार, काव्यसाधना पुरस्कार, सावित्रीबाई फुले काव्य पुरस्कार इत्यादी सन्मानाने ते पुरस्कृत आहेत. विद्रोह, अंतस्थ प्रेरणा, सामाजिक चिंतन, अस्मितेसाठी लढा हे त्यांच्या काव्य लेखणीचे विशेष सांगता येतात.

'युद्ध अटळ आहे' या काव्यसंग्रहातील प्रस्तुत कविता असून, इथे कवीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी विचाराची ओळख समाजाला करून दिली आहे. मानवी जीवनाच्या उत्कर्षासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक संघर्षाचा आढावाही घेतला आहे. जाती विषमता नष्ट करण्यासाठी, बौद्ध तत्त्वज्ञान किती महत्त्वाचे आहे? हा विचार या कवितेतून आलेला आहे. अर्थात ही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे स्तवन करणारी आहे.

कवी इथे म्हणतो की असा शिल्पकार म्हणजे मूर्ती घडवणारा या उभ्या जगात आजपर्यंत कोणी झाला नाही. ज्याने भंगलेल्या पाषाणांना म्हणजे उपेक्षित, दिनदलित लोकांना आकार दिला व नवे जीवन दिलेले आहे. तो बाबासाहेब आंबेडकर आहे! गावकुसाबाहेर ज्यांना हाकाललेले होते, त्या वंचित लोकांचा कुणी वाली त्या काळात नव्हता, रक्षक तर मुळीच नव्हता अशा निराश्रीत लोकांना माऊलीसारखा म्हणजे आईसारखा आधार दिला. तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे म्हणून तर कवी त्यांच्याविषयी म्हणतो –

**"गावा कुसा दूर नसे कोणी वाली**
**झालात माऊली दुबळयांची"** **किंवा**
**"सापाला का दूध मुंगीला साखर**
**ना देती भाकर माणसाला"**

इथे सापाला दूध, मुंगीला साखर तसेच दिन दलितांना माणुसकीची भाकर बाबासाहेबांनी दिली. भेदभावांच्या भिंती, गुलामगिरीच्या बेड्या, तुरुंगाच्या भिंती ज्या परंपरेने चालत आल्या होत्या; त्या तोडून माणसातला माणूस ओळखला! भुकेले, कंगाल, वंचित यांना त्यांनी आपल्या धम्माची शिदोरी दिली व न्याय, समता, बंधुभाव निर्माण केला; एवढेच नाही तर.....

**"मुके बहिरेही बोलू लागलेत**
**लिहू लागलेत व्यथाकथा**
**धम्मविचाराचा चवदार पान्हा**
**पाजुनिया तान्हा रक्षीयेला**
**धम्मक्रांती ऐसी केली तुम्ही बाबा**
**उन्नतीचा गाभा सापडला"**

इथे बाबा म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांनी जे लोक मुके व बहिरे, न बोलू शकणारे, न ऐकू शकणारे, दडपल्या गेलेले, जे लोक होते त्यांना आपली व्यथा, कथा, विचार व्यक्त करायला प्रवृत्त केले व त्यामुळे ते आपले विचार मांडू लागले! यासोबतच धम्मविचार म्हणजे चवदार पान्हा आहे. हे सांगून त्यातून माणसाच्या उन्नतीचा मार्ग सांगितला म्हणून तर कवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या जगात अद्वितीय शिल्पकार समजतात! या कवितेत बाबासाहेबांचे कार्य अतुल्य आहे हे कवीने सांगून, ते दिनदलितांना स्वाभिमान शिकवणारे, अन्यायाविरुद्ध लढा देणारे, अर्थात सामाजिक क्रांतीची प्रेरणा असून दलितांना दिलेल्या नव जीवनाची स्तूती गाथाच होय!

या कवितेत वीररस व शांतरस पाहायला मिळतो. तो म्हणजे आंबेडकरांनी अन्यायाविरुद्ध उभारलेल्या लढा हा इथे वीररस येतो तर त्यांच्याबद्दल कवीच्या मनातील आदर व कृतज्ञता ही भक्ती आहे. अर्थात भक्तीरस आहे व अखेरीस धम्मक्रांतीमुळे मिळालेली शांती व उन्नती हा शांतरस होय. अलंकारांमध्ये रूपक म्हणून शिल्पकार हा उपेक्षितांना नवजीवन देणारा असून, उत्प्रेक्षा अलंकारात सापाला का दुध, मुंगीला साखर म्हणजे उपेक्षितांना मिळालेला हक्क आहे! भिंती पडल्या, बेड्या तोडल्या यातून मानवीकरण अलंकार दिसून येतो. अन्यायाला मानवी रूप इथे मिळते आहे. कवितेतील सौंदर्य त्यामुळे फुलते. त्यामुळे ही कविता प्रभावी व भावपूर्ण ठरते. विविध प्रतिमा

व प्रतिकांमुळे आंबेडकरांचे कार्य जनसामान्यात पोहोचलेले दिसते. भावगर्भ आंबेडकरवादी कविता म्हणून आपल्याला ती अभ्यासता येते. ही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांती व सामाजिक उन्नतीच्या कार्याची स्तुती करणारी असून; यात वीररस प्रधानता आहे. भक्तीरस व शांतरस हे उपरस म्हणून येतात. आंबेडकरांनी घडविलेली माणसांची क्रांती येथे शिल्पकाराच्या प्रतीकातून कवीने अभिव्यक्त केली आहे.

***

# १४. मुंग्यांचे हरवत नाहीत आत्मसूर

**– वृषाली किन्हाळकर**

**परिचय: -** वृषाली माधवराव किन्हाळकर (जन्म १९५९)

१९९० नंतरच्या मराठीतील प्रसिद्ध कवयित्री व लेखिका म्हणून परिचित. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे समाजातील स्त्रियांना किती अवहेलनात्मक जीवन जगावे लागते? हे वास्तव अतिशय निर्भीडपणे आपल्या कवितेतून मांडण्याचा त्या प्रयत्न करतात. भावनांच्या जीवनामधील गुंतागुंत, स्त्रियांचे विविध प्रश्न, स्वार्थीपणा, नातेसंबंधातील कोरडेपणा व विसंवाद इत्यादी अनेक भावविश्वासंबंधी त्यांचे लेखन आहे.

'वेदन', 'तारी' हे त्यांचे काव्यसंग्रह असून 'मुक्तामाय' हे दीर्घकाव्य प्रकाशित आहे. 'सहजरंग', 'संवेद्य' ही ललित लेखसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या कवितेचे हिंदी व इंग्रजी अनुवाद झालेले आहेत. तसेच विद्यापीठ अभ्यासक्रमात त्यांच्या साहित्याचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाचा इंदिरा संत पुरस्कार, मसापचा राजकीय यशवंत पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेचा कुसुमावती देशमुख काव्य पुरस्कार, राय हरिश्चंद्र दुखी पुरस्कार, सुनीताबाई गाडगीळ पुरस्कार, ' तारी' हिंदी अनुवादास मामा वरेरकर महाराष्ट्र राज्य हिंदी अकादमी पुरस्कार त्यांना प्राप्त आहे. ७वे मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन, धाराशिव, ग्रामीण साहित्य संमेलन, पळसप व लोकसंवाद साहित्य संमेलन, करकाळा या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले आहे तसेच 'तिफन' राज्यस्तरीय काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान ही त्यांना लाभलेला आहे.

प्रस्तुत कविता त्यांच्या ‘तारी’ या काव्यसंग्रहातील असून यात मुंगीचे कष्ट करणारे जगणे हे किती इमानी असते? ते कवयित्रीने दाखवून दिले आहे. तिची पंढरी तिच्या कष्टामध्ये आहे. ती राम व विठ्ठल ही आपल्या कष्टातच शोधते म्हणून मानवाने मुंगीचा आदर्श घेऊन, स्वार्थ व संकुचितवृत्ती सोडून, मानवतावादी मूल्यांचा स्वीकार केला पाहिजे हा अतिशय मोलाचा असा संदेश ‘मुंग्यांचे हरवत नाहीत आत्मसूर’ या कवितेत वृषाली किन्हाळकर यांनी दिलेला आहे.

कवयित्री स्वतः पेशाने एक नामांकित डॉक्टर आहे. या क्षेत्रात कार्य करताना स्त्री जीवनाच्या वेदना व दुःख त्यांनी जवळून पाहिलेले आहे; तरी या दुःखातील मातृत्व म्हणजे आईपण हे किती सुख देणारे असते! या वास्तव जीवनातील भाव कवयित्री आपल्या अनेक कवितांमध्ये प्रगट करते परंतु इथे ‘मुंग्यांचे हरवत नाहीत आत्मसूर’ ही कविता स्वार्थी माणसासाठी त्यांनी लिहिलेली आहे तेव्हा आपल्यातील हा स्वार्थ बाजूला ठेवून, मुंग्यांचे कष्ट डोळ्यासमोर जर आपण ठेवले तर आपल्या जगण्याला नवा आकार येईल असा आशावाद कवयित्री व्यक्त करत आहे.

या कवितेत कवयित्री ही मुंग्याच्या जीवनातील गहन जीवनतत्व वा सूत्र सांगत आहे कारण मुंग्या ह्या उन्हात, पावसात किंवा वादळातही अखंड मेहनत घेत राहतात. त्यांची रांग जरी कष्ट करताना विस्कळीत झाली तरी त्या परत एकवटून आपल्या कामाला लागतात हाच त्यांचा निग्रह, सहकार्य भाव व कष्टमग्नता किती महत्त्वाची आहे? हेच त्यांच्या जीवनाचे धर्मस्थान आहे! म्हणून या मुंग्यांसाठी काम म्हणजे राम आहे! कष्ट म्हणजेच वारीचा नियम आहे तर परमग्नता हाच त्यांचा विठोबा आहे! त्या एकमेकीला काही एक न बोलता कशी साथ देतात? त्यातील एखादी जर थकली तर बाकीच्या तिचे ओझे उचलतात म्हणून तर कवयित्री म्हणते,”एक

अकेला थक जायेगा, मिलकर बोज उठाना!" ही ओळ या कवितेत जरी हिंदी असली तरी इथे सार्थ ठरणारी अशी आहे! त्यांच्या कृतीला ती लागू होते पण माणूस मात्र –

**"माणूस मात्र**
**अशा कवितेच्या ओळी फक्त लिहीत असतो!**
**एकेकटाच आयुष्याशी लढत असतो.**
**मनजोगती सम साधण्यासाठी धडपडत असतो!"**

इथे माणूस फक्त कविता लिहूनच थांबतो. स्वतः एकटा आपल्या आयुष्याशी झुंज देत राहतो. मनात द्वंद्व, संघर्ष व बेईमानी चालू असते. मुंगी मात्र नि:शब्द साधना, एकता व आत्मनिष्ठा यामध्ये जगत राहते व आपले आयुष्य आपल्या ध्येयापर्यंत नेऊन गाठत राहते म्हणून तर कवयित्रीला असे सुचित करायचे आहे की माणसानेही मुंग्यांकडून आदर्श घेऊन एकता, श्रमशीलता, आत्मनिष्ठा व जीवनाची साधना शिकून स्वतःला विकसित करावे. अर्थात ही कविता साध्या मुंगीच्या जीवनातील जरी असली तरी मानवी जीवनाच्या आदर्शासाठी महत्वपूर्ण आहे यातील कष्ट, निग्रह व सहकार्य हे शब्द मूलभूत जीवनमूल्ये आहेत. आपल्यातील एकटेपणा, बेईमानी व आत्मग्लानी यावरही ती भाष्य करते.

विविध भावरसातील शांतरस हा मुंगीचा श्रमशील साधनेच्या वृत्तीतून दिसून येतो तर वीररस हा वादळ, अडथळे यातून मुंग्यांचा निग्रह सुचित करतो. काही अंशी हास्यरसाची छटा निर्माण करणारा माणूस हा कविता लिहूनच थांबतो पण प्रत्यक्ष कृती मात्र करत नाही. यातील उपरोध इथे व्यक्त होतो. या सर्व कलात्मक वैशिष्ट्यांकडे येताना मुंगी ही श्रम, एकता व साधना यांचे प्रतीक वाटते. 'कामातच राम आहे', 'कष्ट पंढरीची वारी' यातील उपमा ह्या अध्यात्मिक रंग चढवणाऱ्या दिसून येतात. माणूस व मुंगी यांची

तुलना ही जीवनमार्ग व विरोधाभास सांगणारी अशी आहे. कवितेची सहज, प्रवाही भाषा ही सामान्य वाचकांनाही अगदी सहज कळणारी असल्याने, यातील सरळ शब्दयोजना महत्त्वपूर्ण वाटते.

शेवटी कवयित्रीला इथे मुंग्याप्रमाणे एकता, श्रमशीलता व आत्मनिष्ठा माणसाने अंगी बाळगावी तेव्हाच मानवी जीवनाची खरी पंढरी गाठता येईल असे वाटते. ही कविता लहानशा मुंगीच्या जीवनातून माणसाला मोठा जीवन धडा शिकवणारी असून 'कामातला परममग्नतेचा विठोबा' व 'सहकार्य भाव' ही मुंगीची जीवननीती मानवी जीवनासाठी महत्त्वाची आहे तेव्हा ही कविता प्रतीकात्मक तर आहेच पण तात्विक व प्रेरणादायी मानवासाठी महत्वपूर्ण आहे, असे वाटायला लागते!

***

# १५. टीव्हीवर सिनमा चालू व्हता

**- दिशा पिंकी शेख**

**परिचय:-** दिशा पिंकी शेख (जन्म १९८४)

दिशा शेख ह्या नाशिक जिल्ह्यातील 'येवला' या गावी जन्माला आल्या. त्यांचा जन्म हा भटक्या-विमुक्त जमातीत झाल्याने अगदी बालवयात असताना, सतत भटकंती त्यांना करावी लागली. त्यामुळे शालेय शिक्षण घेताना, त्यांना अनेक शाळा बदलाव्या लागल्या होत्या. या सर्वांमुळे त्यांचे शिक्षण फक्त १० वी पर्यंत झाले. त्या किशोरवयीन अवस्थेत असताना सत्यशोधक विद्यार्थी संघटनेच्या संपर्कात आल्या त्यामुळे जात, वर्ण, वर्ग लिंगभेदाच्या विरोधात अगदी कमी वयापासूनच त्यांच्या मनात चीड निर्माण झालेली दिसून येते.

इ.स.२०२१ मध्ये त्यांचा 'कुरूप' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. कवितेसोबतच त्या स्तंभलेखनही करतात. 'कुरूप' या काव्यसंग्रहाला 'सरस्वती लक्ष्मण पवार' हा राज्यस्तरीय काव्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. नाशिक येथील परिवर्तन वाङ्मय पुरस्कार, कोल्हापूर विद्यापीठाचा ऋत्विक काळसेकर पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

अनेक वर्षापासून त्या लिंगभेद समानतेसाठी जनजागृतीचे महत्त्वाचे कार्य करतात. महाराष्ट्र राज्य तृतीयपंथ हक्क, संरक्षण व कल्याणकारी मंडळाच्या त्या सदस्य आहेत. सामाजिक समता, समाजभान, वेदना व परिवर्तन इत्यादी त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये दिसून येतात.

प्रस्तुत कविता त्यांच्या 'कुरूप' या काव्यसंग्रहातील असून यामध्ये सामाजिक समाज जीवनाचे विदारक, वास्तव आलेले आहे.

या कवितेत चित्रपटातील नायक हा अन्याय, अत्याचार, स्त्री शोषणाच्या विरोधात विद्रोह करणारा असा आहे. त्यामुळे त्याच्या त्या कृतीला जनतेची साथ मिळताना दिसते परंतु वास्तवात मात्र असे कुठेही घडत नाही याची तीव्र खंत कवयित्रीला वाटत आहे!

मानवी जीवनात समता, मानवता व आत्मभानाचे मूल्ये प्रगट करणारा विचार या कवितेत आला आहे तसे पाहता दिशा पिंकी शेख या समकालीन मराठी कवितेतील वंचित व तृतीयपंथी जीवनाला अभिव्यक्त करणाऱ्या महत्त्वाच्या कवयित्री आहेत. चळवळ व कविता हे त्यांचे बलस्थाने आहेत; याच माध्यमातून शोषित समूह घटकाच्या प्रगतीसाठीचे बंडखोर विचारविश्व त्या प्रगट करणाऱ्या, महत्त्वाच्या कवयित्री आहेत. 'टीव्हीवर सिनमा चालू व्हता' ही शेख यांची कविता वर्तमान समाज जीवनातील दाहक वास्तवाला हात घालते पण चित्रपटातील नाटक हे शोषणाच्या विरोधातील संघर्ष करणारे आहे म्हणून त्याला साथही मिळते. वास्तवातील नायकाचा संघर्ष प्रचंड कठीण असतो; हा वास्तव धागा कवयित्रीने आभासी जगातील अंतर्विरोध व्यक्त करणार कसा आहे म्हणून तर कवयित्री म्हणते –

**"टीव्हीवर सिनमा चालू व्हता**
**नायक विद्रोह करत होता, व्यवस्थेच्या विरोधात**
**पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात, शोषणाच्या विरोधात**
**आणि टीव्हीच्या बाहेर आहे मी,**
**हे विसरून नकळत पेटून उठले."**

या कवितेतून स्त्रीच्या मनातील आकांक्षा, विद्रोह आणि निराशा पहावयास मिळते. इथे टीव्हीवर चालणाऱ्या सिनेमात नायक समाजातील अन्यायविरुद्ध बंड करताना दिसतो परंतु पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरुद्ध, शोषणाविरुद्ध, व्यवस्थेविरुद्ध हा त्या नायकाचा विद्रोह पाहून कवयित्रीच्या मनामध्ये ही या व्यवस्थेच्या

विरुद्ध संताप जागा होतो. त्यामुळे तिच्या मुठी आवळल्या जातात; जणू ती स्वतःही या संघर्षात सामील झाली आहे असे वाटायला लागते पण शेवटी हा चित्रपट असतो, तो काल्पनिक असून, तीन तासाचा खेळ असतो; हे जेव्हा तिच्या लक्षात येते तेव्हा खरे वास्तव समजून येते व क्षणभर सर्व भयानक तिला वाटू लागते! हे सर्व दीर्घकाळापासून चालूच आहे हे जेव्हा तिला कळते तेव्हा नायकाच्या विद्रोहाला टीव्हीमध्ये जनतेचा पाठिंबा पण मिळालेला असतो. संघटनेची साथ व नायिकेचे सहकार्यही मिळालेले त्यांना दिसते. वास्तविक जीवनात मात्र असे पाहायला मिळत नाही. चित्रपटातील नायक-नायिका शोषण थांबवतात व वास्तवात स्त्रिया अजूनही पुरुषप्रधान मनोरंजनाच्या चौकटीत अडकलेल्या दिसतात. हे सारे पाहून कवयित्रीला स्वतःवरच हसू यायला लागते व आवळलेली मूठ त्या सैल करतात तेव्हा पुन्हा वास्तवातील 'भोंगळया कारभाराकडे' म्हणजे अन्याय, दडपशाही, असमानता या गोष्टी पाहत राहते यावर उपाय तिला सुचत नाही मग अंथुरनातच त्या निपचित पडून राहतात!

चित्रपटातील विद्रोह व वास्तवतील असहायता यांचा विरोधाभास हा या कवितेत दिसून येतो तसेच स्त्रीच्या मनातील क्रांतीकारी ऊर्जा आणि तिचे हताश जगणे ही पाहायला मिळते. मनोरंजनामुळे क्षणिक पेटणारी आग मात्र नंतर शांत होते. ही निराशाच स्त्रीच्या जीवनात सतत असते. कवितेतील करूण रस हा वास्तवातील स्त्रीच्या हतबलतेतून प्रगट होतो तर वीररस हा नायकाचा विद्रोह व कवयित्रीच्या सुरुवातीच्या आवेशात दिसून येतो. हास्यरस व उपरोधात मात्र स्वतःवरच कवयित्री हसताना दिसते.

चित्रपटातील काल्पनिक लढा हा अन्यायाविरुद्ध जरी असला तरी तो विरोधाभास निर्माण करणारा आहे. वास्तवात मात्र

कवयित्रीला अपयशी जीवन जगावे लागते. 'आवळलेली मूठ' ही संघर्षाची प्रतिमा असून ' सैल सोडलेली मूठ' ही शरणागतीचे प्रतीक म्हणून इथे येते आहे तर 'अंथुरणात पडून वास्तव पाहणे' ही एक गहन प्रतिमा आली असून यात स्त्री दुःख दिसून येते! या कवितेची भाषाशैली थेट काळजाला हात घालणारी, बोलकी, संवाद करणारी व जिवंत अशी वाटते.

शेवटी कवयित्रीला सांगायचे आहे की या चित्रपटातील नायकासारखा विद्रोह येथे पुरेसा नाही तर वास्तवात संघटित होणे, चळवळ उभारणे गरजेचे आहे. स्त्रियांनी खऱ्या अर्थाने मनोरंजनाच्या चौकटीबाहेर जाऊन, स्वतःचे हक्क मिळवण्यासाठी, संघर्ष करणे गरजेचे आहे! अन्यथा विद्रोह हा फक्त क्षणभंगुर आवेश निर्माण करणारा असा आहे. ही कविता स्त्री जीवनाच्या वास्तवातील संघर्ष, स्वप्नभंग आणि निराशा यांचे प्रभावी चित्रण करते. या मनोरंजनातून निर्माण झालेला विद्रोह हा एक भ्रम वाटायला लागतो पण खरी लढाई ही स्त्रीच्या वास्तवाची आहे; ती तिला लढावी लागणार आहे! असा ठाम संदेश ही कविता देते म्हणून स्त्रीवादी काव्यातील ही कविता महत्त्वपूर्ण अशी आहे असे सांगता येते.

***